रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १६ ◆ अंक १२८

www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, २५ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

‘भाजपला साथ म्हणजेच भारताला आत्मनिर्भर करणे’/२

मुरूड येथील समुद्रकिनारा सुशोभीकरण अंतिम टप्प्यात/५

भारताचा ऑस्ट्रेलियावर रोमहर्षक विजय/८

## अभ्युदय को-ऑप. बँकेच्या संचालक मंडळावर कारवाई

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळावर कारवाई केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाला खराब प्रशासन मानकांमुळे १२ महिन्यांच्या कालावधीसाठी हटवण्यात आले आहे तसेच बँकेच्या कारभाराचे व्यवस्थापन करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचे माजी मुख्य महाव्यवस्थापक सत्यप्रकाश पाठक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासकासोबतच आरबीआयकडून सल्लागारांची समितीदेखील नियुक्त करण्यात आलेली आहे. दरम्यान, आरबीआयकडून बँकेवर कोणतेही व्यावसायिक निर्बंध घातलेले नाहीत. त्यामुळे बँकेचे व्यवहार सुरळीत राहणार असून ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### खोटे शपथपत्र बनवून शासनाची फसवणूक

# शेकापचा माजी नगरसेवक सुनील बहिरा गजाआड

### पाच दिवसांची पोलीस कोठडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**प्रॉपर्टीसाठी मयत वडिलांचे खोटे शपथपत्र बनवून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेलमधील शेकापचा माजी नगरसेवक सुनील गोविंद बहिरा यास पनवेल पोलिसांनी गजाआड केले असून गुन्ह्याचे गंभीर स्वरूप पाहता न्यायालयाने अधिक चौकशीसाठी त्याला २८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**



शेकापचा माजी नगरसेवक सुनील बहिरा हा तक्का गावातील असून त्याने सन १९९७मध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे तत्कालीन पनवेल नगर परिषदेकडून अंतिम भूखंड क्रमांक १६३३ ब आणि १६३७वर इमारत बांधकाम परवानगी मिळवलेली आहे. हे दोन्ही भूखंड हे सुनील बहिरा यांचे वडील कै. गोविंद काथोर बहिरा यांच्या मालकीचे होते. गोविंद बहिरा यांचे निधन १७ नोव्हेंबर १९७७ रोजी झालेले आहे. सुनील बहिरा याने गोविंद बहिरा हे मयत असतानादेखील त्यांच्या जागी तोतया व्यक्ती उभा करून पनवेल कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर २० रुपयांच्या स्टॅम्पवर शपथपत्र केलेले आहे आणि हा स्टॅम्प पेपर सुनील बहिरा याने विकत घेतल्याची नोंद या स्टॅम्पवर नमूद आहे. हे शपथपत्र विशाल पगडे यांनी माहिती अधिकारात प्राप्त केलेले आहे.

कै. गोविंद काथोर बहिरा हे सन १९७७मध्ये मयत असताना प्रॉपर्टीसाठी सन १९९७ साली त्यांच्या नावाने शपथपत्र केले गेले असून त्यांचा खोटा अंगठा सुनील बहिरा याने या स्टॅम्पवर मारून त्रयस्थ व्यक्ती गोविंद बहिरा असल्याचे भासवले आणि मयत व्यक्तीला जिवंत दाखवत शपथपत्राचा फायदा घेऊन बांधकाम परवानगी मिळवली होती. (पान २ वर..)

### फसवणूक आणि गुंडगिरीची परंपरा

फसवणूक आणि वारंवार लोकांमध्ये दहशत माजवण्याचा उपक्रम हाती घेतलेल्या सुनील बहिरा याला तक्का गावातील नागरिकही हैराण झाले आहेत. नागरिकांची फसवणूक आणि दमबाजी नित्यनेमाची असल्याने अखेर तक्का गावातील विशाल धर्मा पगडे यांनी सुनील बहिरा याच्याविरोधात शासनाची फसवणूक केल्याबद्दल कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात व पनवेल महापालिकेस पुराव्यानिशी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार चौकशी करून पालिकेचे अधिकारी नितीन हुद्दार यांनी शासनाच्या वतीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पबाधितांना लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळावी

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची एमएमआरडीएसोबतच्या बैठकीत मागणी



(छाया : योगेश पाटील)

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसानभरपाई मिळण्यासंदर्भात मुंबई येथे एमएमआरडीएच्या कार्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि.२४) बैठक झाली. या वेळी त्यांनी लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पामुळे न्हावा आणि गव्हाणमधील अनेक मच्छीमार प्रकल्पबाधित झाले आहेत. या प्रकल्पग्रस्तांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न प्रलंबित असून या संदर्भात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत एमएमआरडीएच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रतीमा कुदळवाडकर यांच्यासोबत मुंबई येथील कार्यालयात सकारात्मक चर्चा झाली. या वेळी लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली.

या बैठकीला उद्योजक जे.एम.म्हात्रे, न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष सुरेश पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, सदस्य सागरशेठ ठाकूर, किशोर पाटील, सुहास भगत, वंदना पाटील, एमएमआरडीएचे अधिकारी एम.पी.सिंग यांच्यासह न्हावा आणि गव्हाणमधील प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.



## निवडक

### म्हाडाच्या ‘त्या’ घरांच्या किमती होणार कमी

**मुंबई :** अनेक दिवस म्हाडा लॉटरीतील पडून असलेल्या घरांच्या किमती कमी होणार आहेत. याबाबत माहिती देताना गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांनी सांगितले की, विक्रीअभावी पडून असलेल्या ११ हजार घरांच्या किमतीचा आढावा घेऊन निर्णय घेणार असून या घरांच्या किमती कमी करून पुनर्विक्री करण्यात येणार आहे.

### सीएसएमटीच्या पुनर्विकास कामाला झाली सुरुवात

**मुंबई :** येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) स्थानकाचा लवकरच कायापालट होणार आहे. प्रवाशांसाठी आता अत्याधुनिक सुविधा देण्यात येणार आहेत. या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली असून त्यासाठी दोन हजार ४०० कोटी खर्च केले जाणार आहेत, अशी माहिती केंद्रीय रेल्वेराज्य मंत्री रावसाहेब दानवे यांनी दिली. दरम्यान, प्रकल्पपूर्तीसाठी साधारणपणे चार वर्षांची कालमर्यादा आहे.

# कोळी समाजाला लवकरच अनुसूचित जमातीचे दाखले -आमदार रमेश पाटील

### रेवदंड्यात जागतिक मच्छीमार दिन उत्साहात साजरा



(छाया : महेंद्र खैरे)

**रेवदंडा : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य व शासन मच्छीमारांच्या पाठीशी ठामपणे उभे असून भाजपने कोळी समाजाचे अनेक प्रश्न सोडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कोकण विभागातील कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे दाखले मिळत नव्हते, परंतु सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे. या समितीचा अहवाल कोळी समाजाच्या बाजूने येणार असून गेले कित्येक दिवस बंद असलेले अनुसूचित जमातीचे दाखले आपल्या समाजाला पुन्हा मिळणार आहेत, असा विश्वास कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार रमेश पाटील यांनी व्यक्त केला आहे.

जागतिक मच्छीमार दिनाचे औचित्य साधून भाजप मच्छीमार सेल आणि कोळी महासंघाच्या विद्यमाने गुरुवारी (दि.२३) रेवदंडा येथे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राज्य शासनाच्या पतन विभागामार्फत आमदार रमेश पाटील यांच्या स्थानिक विकास निधीमधून रेवदंडा बंदरात कोळी बांधवांसाठी निवारा शेड बांधण्यात आली आहे. त्याचा लोकार्पण सोहळाही या वेळी आमदार पाटील यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी, भाजप मच्छीमार सेलचे प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड.चेतन पाटील, कोळी महासंघाचे कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, उपाध्यक्ष दिलीप भोईर, अलिबाग तालुका अध्यक्ष उदय काठे, माजी तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, भाजपचे मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, जयवंत अंबाजी, उपाध्यक्ष मनोहर मकु, शिवसेनेचे अनंत गोंधळी, सागर कन्या मच्छीमार सोसायटीचे अध्यक्ष मनोहर बैले, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, उपसरपंच मंदाताई बळी, (पान २ वर..)

# इर्शाळवाडी दरडग्रस्तांच्या पुनर्वसन कामाला वेग

### घरे उभारण्यासाठी प्री कास्ट तंत्रज्ञानाचा वापर





**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

खालापूर तालुक्यातील दरडग्रस्त इर्शाळवाडीतील आपदग्रस्त कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन केले जाणार आहे. चौकमधील मानिवली येथे अडीच हेक्टर जागेत ४४ घरे बांधण्यात येत आहेत. सिडकोच्या माध्यमातून ही घरे बांधून दिली जाणार आहेत. यासाठी प्री कास्ट तंत्रज्ञान वापरले जात असून हे काम वेगाने सुरू आहे.

कमी वेळात अधिक घरे तयार करण्यासाठी प्री कास्ट तंत्रज्ञान वापरले जाते. घर तयार करण्यापूर्वी त्याची संकल्पना तयार केली जाते. कास्टिंग केले जाते आणि त्याचे मोल्ड बनवले जातात. त्यानुसार घराचे वेगवेगळे भाग काँक्रीटमध्ये तयार केले जातात आणि ते जोडून घर उभे राहते. यामध्ये वेळ कमी लागतो. शिवाय घरे अधिक मजबूत व टिकाऊ होतात. दरडग्रस्तांना केवळ घरच नाही, तर अंतर्गत रस्ते, पाणी, वीज तसेच शाळा, समाजमंदिर, खेळाचे मैदान या सुविधाही पुरवल्या जाणार आहेत.

खालापुरातील इर्शाळवाडी आदिवासीवाडीवर १९ जुलैच्या रात्री दरड कोसळली. तेथील कुटुंबाना तेथे राहणे शक्य नसल्याने त्यांचे स्थलांतर करणे गरजेचे होते. दरड दुर्घटनेनंतर सरकारने आपदग्रस्त कुटुंबांचे तात्पुरते पुनर्वसन लगेचच केले. त्यानंतर तातडीने पावले उचलत या कुटुंबांचे कायमस्वरूपी व सुविधांयुक्त पुनर्वसन लवकरात लवकर कसे होईल यासाठी पावले उचलली. या अनुषंगाने इर्शाळवाडीपासून जवळच असलेल्या चौक मानिवली येथील २.६० हेक्टर जागा हस्तांतरीत करण्यात आली. पुनर्वसनासाठीच्या आराखडा चालाही एमएसआरडीसीने लागलीच मंजुरी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः या संपूर्ण पुनर्वसन प्रक्रियेत लक्ष घातले असून हे काम लवकरात लवकर, पण दर्जेदार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार इर्शाळवाडी पुनर्वसनाचे काम वेगाने सुरू आहे.

### नागरी सुविधाही पुरवणार

दरडग्रस्तांसाठी मानिवली येथे पाच एकर जागेमध्ये ४४ घरे उभारली जात आहेत. हॉल, किचन, बेडरूम, स्वच्छतागृह, आणि मोकळी जागा अशी घरांची रचना असेल. घरे काँक्रीटची असतील, तर छप्पर स्लॅबचे असेल. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी स्वतंत्र नाला असेल, ज्यामुळे घरांना धोका होणार नाही. याशिवाय इतर नागरी सुविधांचादेखील यात समावेश आहे. सहा महिन्यांत या घरांचे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, असे प्रकल्प व्यवस्थापक उत्तम नागटिळक यांनी सांगितले.

# विवाहासाठी इच्छुकांची लगीनघाई!

**मुंबई : प्रतिनिधी**

तुळशी लग्न सोहळा शुक्रवारी (दि. २४) मोठ्या उत्साहात साजरा झाल्यानंतर विवाह इच्छुकांच्या लगीनघाईला वेग येणार आहे. पुढील २३ दिवसांत भारतात ३५ लाख लग्न होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यानिमित्ताने कोट्यवधी रुपयांची उलाढाल होईल.

नक्षत्रांच्या गणनेप्रमाणे नोव्हेंबर महिन्यामध्ये लग्नाचे मुहूर्त २३, २४, २७, २८, २९ तारखेला आहेत, तर डिसेंबर महिन्यात ३, ४, ७, ८, ९ व १५ तारखेला लग्नाचा मुहूर्त आहे. यानंतर थेट जानेवारी महिन्यात शुभ दिवस असतील, असे कन्फ्रेडेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) चे अध्यात्मिक तसेच वैदिक ज्ञान समितीचे अध्यक्ष वैदिक विद्वान आचार्य दुर्गेश तारे यांनी सांगितले.

लग्नांसाठी वेगवेगळ्या सेवा पुरवणाऱ्या उद्योगांचीही रेलचेल मागील काही आठवड्यांपासून देशभरात सुरू आहे. विवाह सोहळ्यांच्या या सिझनमध्ये जवळपास ४.२५ लाख कोटींची उलाढाल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ‘कॅट’चे अध्यक्ष बी. सी. भरतिया आणि राष्ट्रीय महामंत्री प्रवीण खंडेलवाल यांनी त्यांचा संशोधन विभाग म्हणजेच कॅट रिसर्च अ‍ॅण्ड ट्रेड डेव्हलपमेंट सोसायटीच्या हवाल्याने एक अहवाल जारी केला आहे. देशातील २० मुख्य शहरांमधील व्यापारी आणि लग्नासंदर्भातील सेवा पुरवणाऱ्यांचे त्यांनी सर्वेक्षण केले. त्यानुसार केवळ दिल्लीमध्ये या सिझनदरम्यान तब्बल ३.५ लाख लग्न होणार आहेत. दिल्लीमध्येच या २३ दिवसांच्या कालावधीत जवळपास एक लाख कोटींची उलाढाल होणार आहे.

### कोट्यवधींची होणार उलाढाल



लग्न सोहळ्यांसंदर्भातील खरेदीचा जोर पुढील काही दिवसांमध्ये वाढणार असल्याने व्यापाऱ्यांनीही यासाठी आधीपासूनच विशेष तयारी केली आहे. दिवाळीनंतर लगेच सुरू होत असलेल्या लग्नाच्या सीझननिमित्त मोठ्या प्रमाणात फायदा होईल, अशी व्यापाऱ्यांना अपेक्षा आहे.

# कोकणासह राज्यात अवकाळी पावसाची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**



हिवाळा सुरू झाला असताना राज्यात पुढील किमान चार दिवस विविध भागांमध्ये कमी-जास्त स्वरूपात पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे सुट्टीमध्ये फिरायला जाणाऱ्यांच्या प्लॅनवर पाणी फेरले जाऊ शकते.

मान्सूनने माघार घेतल्यानंतरचा काळ हा वादळांसाठी पूरक असतो. या काळात अनेक चक्रीवादळे निर्माण होतात. यांचे प्रमाण अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात जास्त असते. सध्याच्या घडीला बंगालच्या उपसागरामध्ये एक कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. हा कमी दाबाचा पट्टा सध्या महाराष्ट्राच्या दिशेने पुढे सरत असल्यामुळे येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये राज्यात अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, लातूर, सोलापूर, कोल्हापूर या भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसेल. मुंबईतही हाच इशारा लागू आहे.

# भाजपला साथ म्हणजेच भारताला आत्मनिर्भर करणे : चंद्रशेखर बावनकुळे

**नंदुरबार : प्रतिनिधी**

दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी म्हणत होते, की भाजपला साथ म्हणजे भारताला आत्मनिर्भर करणे, भारतातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहिल त्यासाठी प्रयत्न करणे असा होईल. आता वाजपेयी यांचे स्वप्न लवकरच साकार होणार असून, त्यासाठी आपण प्रत्येकाने भाजपला साथ द्या म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी सक्षम व आत्मनिर्भर भारत निर्माण करू शकतील, असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. भाजपतर्फे घर चलो अभियानास नंदुरबार येथून सुरुवात करण्यात आली. त्या वेळी बावनकुळे बोलत होते.




या वेळी आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित, भाजप प्रदेश महामंत्री विजय चौधरी, खासदार डॉ. हीना गावित, जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित, भाजप जिल्हाध्यक्ष नीलेश माळी, आमदार राजेश पाडवी, माजी आमदार शिरीष चौधरी, जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, २०२४मध्ये होणाऱ्या निवडणुकीत ४५ खासदार तसेच मोठ्या संख्येने आमदार निवडून आणायचे आहेत. त्यासाठी घर चलो संपर्क अभियानाला सुरुवात केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी २२ जानेवारी २०२४ला रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणार आहेत. मोठ्या संख्येने अयोध्येला यावे. पंतप्रधान मोदी यांनी नऊ वर्षांत विविध योजना राबविलेल्या आहेत. त्यात पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकासांतर्गत पीएम गतिशक्ती मास्टर प्लॅनची स्थापना, २०२४पासून वाहतूक आणि महामार्ग बजेटमध्ये ५० टक्के वाढ, तसेच नारी तू नारायणी : महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत ९.६ कोटी एलपीजी कनेक्शन देण्यात आले.

या योजना संसदरत्न खासदार डॉ. हीना गावित यांनी, लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात राबविल्या आहेत. या योजनांची माहिती देण्यासाठी घर चलो संपर्क अभियान सुरू करण्यात आहे. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. या वेळी घर चलो संपर्क अभियानाची प्रचार रॅली काढण्यात आली. रॅलीद्वारे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी नागरिकांशी संवाद साधला.

### योजना गरिबांपर्यंत पोचाव्यात : डॉ. गावित

***मंत्री डॉ. गावित म्हणाले की, घर चलो संपर्क अभियानातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेल्या योजना गोरगरीब जनतेपर्यंत पोचल्या पाहिजेत. सशक्त शेतकरी, समृद्ध भारत या योजनेच्या माध्यमातून प्रधानमंत्री किसान योजनेंतर्गत १२ कोटी शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपयांची आर्थिक मदत तसेच प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत ३७.५ कोटी शेतकऱ्यांची नोंदणी केली.***

## खाडी प्रदूषणामुळे पारंपरिक मच्छिमारांचा व्यवसाय घटला

**उरण : वार्ताहर**

उरण– पनवेलच्या विविध खाड्या, किनारपट्टीवरील जलप्रदूषण वाढले आहे, तर दुसरीकडे मातीचा भराव करून खाडीमुख बुजविण्यात येत आहेत. खाडीतील वाढते जलप्रदूषण आणि भराव यामुळे किनाऱ्याच्या परिसरात आढळणाऱ्या विविध माशांच्या काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांना याचा आर्थिक फटका बसला आहे.

उरण–पनवेल परिसरातील करंजा, मोरा, हनुमान कोळीवाडा, पाणजे, कुंडेगाव खोपटा, वशेणी, न्हावा, गव्हाण, कोपर, उलवा आदी परिसर पारंपरिक मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे, परंतु गेल्या काही वर्षांत या व्यवसायात अनेक अडचणी उद्‍भवू लागल्या आहेत. वाढत्या जलप्रदूषणामुळे किनाऱ्यालगत आणि खाडीत मासळीचे प्रमाण घटले आहे.

खाडी, किनारपट्टीवर मिळणारे बोंबील, ढोमी, मांदेली, घोळ, कलेट, कोलंबी, शिंगाली, चिंबोरी, खुबे, कालवे, निवट्या, कोळीम, बोईट, पाखट, बाकस, हेकरु, तांब, मुशी, रावस, जिताडी, शेवंड, पाला, करपाल, टायनी–कापसी कोळंबी आदी माशांचे प्रकार आढळतात. दूषित रासायनिक मिश्रित सांडपाणी समुद्र, खाड्यांमध्ये सोडण्यात येत आहे. या वाढत्या प्रदूषणामुळे या क्षेत्रांतील भागातून विविध माशांच्या जाती नष्ट होत आहेत.

मासेच मिळेनासे झाल्याने येथील पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीचे संकट आले असल्याची माहिती कोकण किनारा मच्छिमार संघटनेचे जयवंत तांडेल यांनी दिली.





**मुंबई : रायगड जिल्ह्यातील महाडचे आमदार भरत गोगावले, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे तसेच नगरसेवक संकेत भासे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शुक्रवारी मुंबईत भेट घेतली. या वेळी रायगडातील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात पेण अर्बन बँक, रिलायन्स गॅस पाईपलाईन यांसारखे अनेक प्रलंबित विषय मार्गी लावण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.**

## म्हसळ्यासाठी दिलेला निधी नियोजनपूर्वक खर्च करावा –मंत्री आदिती तटकरे

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील विविध विभागांतून विकासकामांसाठी उपलब्ध केलेला निधी वेळेत व योग्य नियोजन करून खर्च करावा. कामांची पूर्तता होण्यासाठी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी संबंधित खात्याजवळ समन्वयाची भूमिका घेऊन काम करावे, अशा सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.



पंचायत समिती कार्यालयात तालुक्यातील विकासकामांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले हाते. त्या वेळी त्या बोलत होत्या.


बैठकीला तहसीलदार समिर घारे, गटविकास अधिकारी बाळासाहेब भोगे, मुख्याधिकारी विठ्ठल जाधव, नगराध्यक्ष संजय कर्णिक, पीआय संदीपान सोनावणे, बांधकाम अभियंता मुंगे, सहाय्यक अभियंता शेट्ये, जिल्हा परिषद बांधकाम अभियंता मोरे, पाणीपुरवठा अभियंता जे. यु. फुलपागारे, मराविम अभियंता पटवारी, पं. स. कक्ष अधिकारी दिघीकर तालुका अध्यक्ष समीर बनकर, जिल्हा चिटणीस महादेव पाटील, माजी जिल्हा सभापती बबन मनवे, माजी सभापती नाझीम हसवारे, माजी नगराध्यक्ष असहल कादिरी, सुनील शेडगे, संदीप चाचले, संतोष सावंत, छाया म्हात्रे, महिला अध्यक्ष मिना टिंगरे, जिल्हा चिटणीस सोनल घोले, मधुकर गायकर, अनिल बसवत, रेश्मा कानसे, शगुप्ता जहाँगीर, प्रांताधिकारी डॉ. दिपा भोसले आदी उपस्थित होते.


ना. आदिती तटकरे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील सर्वांगिण विकासासाठी शासनाच्या विविध योजनेतून विशेषतः वीज, पाणी, रस्ते, कृषि, शाळा, अंगणवाडी, साकव, सामाजिक सभागृह, ग्रामपंचायत इमारती आदी प्रस्तावित विकासकामांसाठी कोट्यवधींचा निधी उपलब्ध केला आहे. संबंधित कार्यालयीन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी हा निधी वेळेत खर्च करावा. गावागावात जलजीवन योजनेंतर्गत कार्यान्वित असलेल्या पाणीपुरवठा योजना रखडल्या आहेत. याबाबत तक्रारी आल्या असून संबंधित ठेकेदारांच्या कामाचा ठेका लागलीच रद्द करून फेरनिविदा काढण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

पान १ वरुन

## शेकापचा माजी नगरसेवक सुनील बहिरा गजाआड


या अनुषंगाने शासनाची गंभीर फसवणूक केल्याबद्दल विशाल पगडे यांनी पोलिसांकडे दाद मागितली. मागील महिन्यात दाखल झालेल्या गुन्ह्याचा पाठपुरावा त्यांनी केल्याने अखेर सुनील बहिरावर भा.दं.वि. कलम ४१७, ४६५, ४६७, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्या अनुषंगाने आरोपी सुनील बहिरा यास शुक्रवारी (दि.२४) पनवेल न्यायालयात हजर केले असता गुन्ह्याचे गंभीर स्वरूप लक्षात घेता न्यायालयाने अधिक तपासासाठी त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.







शासनाची फसवणूक करणे हा संवेदनशील गुन्हा असताना मागील महिन्यात तक्रार दाखल करूनही अटक करण्यास उशीर झाला असला तरी झालेल्या कारवाईमुळे समाधान व्यक्त करीत आहे. इतके गुन्हे असतानाही उजळ माथ्याने फिरण्याचे काम आरोपी करीत होता. कायदा सुव्यवस्थेचा विचार करता अशा आरोपींना जरब बसली पाहिजे, असे मत तक्रारदाराने व्यक्त केले आहे.

या बांधकामावर अनधिकृतरित्या टॉवर उभारल्याचीदेखील तक्रार ग्रामस्थांनी केलेली आहे. फसवणूक करणे, दमदाटी करणे, मारहाण करणे अशा पद्धतीच्या अनेक तक्रारी सुनील बहिरा याच्यावर तक्का ग्रामस्थांनी केलेल्या आहेत. सुनील बहिरा हा स्वतःच्या पूर्वपदाचा वापर करून तक्का आणि परिसरामध्ये निरनिराळ्या बांधकाम व्यावसायिकांना धमकावणे, त्यांच्याकडून जबरदस्तीने सप्लाय घेणे आणि ग्रामस्थांचा हक्क डावलणे याबाबतीत कुख्यात असून त्यांच्या या कारस्थानाला संपूर्ण ग्रामस्थ कंटाळले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी कारवाई केल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.







## कोळी समाजाला लवकरच अनुसूचित जमातीचे दाखले -आमदार रमेश पाटील

राजहंस टपके, देवानंद भोईर, गोरखनाथ नवरीकर, ताराचंद कोंडे यांच्यासह विविध मच्छीमार संस्थांचे चेअरमन, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार रमेश पाटील पुढे म्हणाले की, कोळी समाजबांधव विविध विभागात नोकरीला असताना सुप्रीम कोर्टाच्या एका निकालामुळे जातीचा दाखल वैध नसल्याने त्यांच्या नोकरीवर गदा आली होती, परंतु त्या वेळचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मानवतावादी दृष्टिकोन दाखवत अधिसंख्य पद नव्याने निर्माण करून मोठा दिलासा दिला. प्रत्येक कोळी बांधवाला आता हक्काचा सातबारा उपलब्ध झाला आहे. रायगड जिल्ह्यात अनेक कंपन्या आहेत. येथे भूमिपुत्राला नोकरीत प्रथम प्राधान्य न दिल्यास मोठे आंदोलन कोळी महासंघातर्फे छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आमदार महेंद्र दळवी यांनी कोळी समाजाला अनुसूचित जमाती दाखले मिळण्यासाठी नागपूर अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार असल्याचे सांगितले. धैर्यशील पाटील यांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना लोकांपर्यत पोहचविण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले पाहिजे हे सांगतानाच राहिल त्याचे घर या प्रमाणे प्रत्येक कोळीवाड्यातील समुद्रालगतच्या जागेचे असेसमेंट पक्के करावे, असे आवाहन केले. प्रकाश बोबडी यांनी मच्छीमारांचे विविध प्रश्न मांडले. दिलीप भोईर यांनी भाजप हा लोकशाही जपणारा पक्ष केंद्र व राज्य शासन लोकहितासाठी काम करीत असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे नियोजन संतोष पाटील, पांडुरंग चौवले यांनी केले होते. या वेळी आयुष्यमान योजनेचे कार्डवाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. मढवी व संतोष पाटील यांनी केले.

## आदिवासी सेवक पुरस्काराने रत्नाकर घरत सन्मानित



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाचे प्रबोधन करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांना नुकतेच शासनाच्या आदिवासी सेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

रत्नाकर घरत यांची नाळ प्रत्येक आदिवासी कुटुंबाशी जोडलेली आहे. त्यांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळवून देण्यासाठी, रस्ते तयार करण्यासाठी, विजेचे प्रश्न सोडविण्यासाठी, नेत्रचिकित्सा शिबिर, आरोग्य शिबिर, जातीचे दाखले काढून देण्यासाठी प्रयत्नशिल असतात.

आदिवासी क्षेत्रातील हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरांवरून त्यांचे कौतुक होत आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी त्यांची निवड करून प्रस्ताव पाठवला त्याबद्दल त्यांचेदेखील आभार मानण्यात आले.

### दुखवटा

## डॉ. श्रीधर जोशी



**श्रीवर्धन** : येथील डॉ. श्रीधर जोशी यांचे बुधवारी (दि. २२) निधन झाले. डॉ. जोशी हे तालुक्यातील पहिले एमबीबीएस डॉक्टर होते. श्रीवर्धनवासियांना जवळजवळ ५५ वर्षे त्यांनी वैद्यकीय सेवा दिली. मागील आठ ते नऊ वर्षांपासून त्यांनी आपला वैद्यकीय व्यवसाय आजारपणामुळे बंद ठेवला होता. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते. श्रीवर्धन शहरातील सोमजाई मंदिरासमोर अनेक वर्ष त्यांचा दवाखाना होता. त्यांच्या पक्षात त्यांचे पुत्र डॉ. कौस्तुभ जोशी हे दवाखाना आता चालवत आहेत. डॉ. श्रीधर जोशी यांच्या निधनाबद्दल अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

निवडक

### दीपावली विशेषांकाचे प्रकाशन



**पनवेल** : भक्तीच्या रसामध्ये श्री स्वामी समर्थ हे नाम सर्वश्रेष्ठ असून आपण नामस्मरण करा, स्वामी नेहमीच आपल्या पाठीशी उभे राहतात हा अनुभव भक्तांना नेहमीच येतो. त्यामुळे स्वामी समर्थ नामाचा विसर पडू देऊ नका, असे आवाहन पनवेल शहरातील श्री स्वामी समर्थ मठ मंदिरातील मठाधिपती सुधाकर घरत यांनी श्री स्वामी समर्थ दिपावली विशेषांकाच्या प्रकाशनावेळी केले. या वेळी स्वामी सेवक संजय कदम, प्रशांत शेडगे आदींसह भक्त या वेळी उपस्थित होते. गेल्या १९ वर्षांपासून या अंकाद्वारे स्वामींच्याबाबत आलेले अनुभव, विचार व प्रसार केला जातो. स्वामींच्या जयघोषात शेकडो स्वामी सेवकांच्या साक्षीने याचे प्रकाशन करण्यात आले.

### अत्रे कट्ट्यावर 'आठवणींच्या साठवणी'

**पनवेल** : मंगला खाडिलकर यांची ओळख केवळ निवेदिका वा सूत्रसंचालिका एवढीच नसून त्या व्यासंगी लेखिका, स्तंभलेखिका व उत्तम मुलाखतकारही आहेत. चित्रपट, रंगभूमी, मालिका, लाईव्ह म्युझिकल शोज अशा ग्लॅमरस जगात वावरताना त्या अनेक सेलिब्रिटींच्या संपर्कात आल्या. या सेलिब्रिटीसंबंधातील अनेक रंजक आठवणी त्यांच्या पोतडीत आहेत. हा आठवणींचा खजिना त्या आठवणींच्या साठवणी या कार्यक्रमात उलगडून दाखविणार आहेत. येत्या रविवारी (दि. २६) सायं. ५.३० वा. सिडको उद्यान, सेक्टर-११, नवीन पनवेल येथील अत्रे कट्ट्यावर हा कार्यक्रम होणार असून सर्व रसिकांसाठी विनाशुल्क असून अधिक माहितीसाठी अरविंद कर्पे (९८३३५ २०२९२) यांच्याशी संपर्क साधावा.

### राज्यस्तरीय ख्याल गायन स्पर्धा

**पनवेल** : युवा पिढीमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण व्हावी या हेतूने पनवेल कल्चरल सेंटरतर्फे राज्यस्तरीय हिंदुस्तानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा आयोजित केली आहे. यात १६ ते ४५ वयोगटातील गायक-गायिकांनी २० मिनिटांच्या कालावधीत ख्याल आणि द्रुत लयीतील बंदिश गायची आहे. ही स्पर्धा दोन फेऱ्यात होईल. पहिल्या फेरीसाठी स्पर्धकांनी आपल्या गायनाचा व्हिडीओ ई-मेल, व्हॉटस्‌ॲप किंवा टेलिग्रामच्या माध्यमातून २० डिसेंबरपूर्वी संस्थेकडे पाठवायचा आहे. २१ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी यातून १० स्पर्धकांची निवड करण्यात येईल. या स्पर्धेचे प्रथम रु. १०,०००, द्वितीय रु. ७,००० तर तृतीय रु. ५,००० असून इच्छुकांनी स्पर्धा समिती प्रमुख मिलिंद गोखले (८८७९९ ८७३७१) यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेल परिसर दुर्गंधीमुक्तीच्या मार्गावर

## सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीची लांबी वाढविण्यास सुरुवात

### शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाटही लावणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा सीईटीपी प्रकल्पातून प्रक्रिया झालेले सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीची लांबी साडेतीन किमी अंतराने वाढवण्यात येत आहे. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून औद्योगिक क्षेत्रातील सांडपाण्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येणार असल्याने पनवेल पालिका औद्योगिक क्षेत्र परिसर दुर्गंधीमुक्त होणार आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक कारखाने आहेत. त्याचबरोबर इतर उद्योगधंदेही सुरू आहेत. या ठिकाणी पाण्याची गरज भासत असते. त्या वेळी कारखान्यांमधील रसायनमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. जुनाट आणि जीर्ण झालेल्या या केंद्राला आता अद्ययावत करण्यात आले आहे. त्याचबरोबर तळोजा सीईटीपी केंद्राचे विस्तारीकरण केले जात आहे पण अनेक वेळा शास्त्रशुद्ध पद्धतीने या पाण्यावर प्रक्रिया केली जात नाही. परिणामी, कोपरा खाडीमध्ये सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे खारघर, कामोठे, कळंबोली, रोडपाली, नावडे, तळोजा ते पनवेलपर्यंत दुर्गंधी पसरत आहे. सध्या सीईटीपीमधून येणारी जलवाहिनी ही कोपरा खाडीपर्यंत आहे. त्यामुळे जुन्या वाहिनीच्या दुरुस्तीबरोबर खाडीच्या पाण्यातून अडीच ते तीन मीटर खोल अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ३.३ किमी अंतराची ६.३० एमएम व्यासाची जलवाहिनी टाकणार आहे. त्यामुळे कांदळवनाचा ऱ्हास होणार नाही, असा दावा केला जात आहे.

एमआयडीसी आयआयटीच्या शिफारशीनुसार तळोजा औद्योगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या जलवाहिनीची लांबी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. वाघिवलीपर्यंत या जलवाहिनीचे विस्तारीकरण करण्यात येणार असून या कामाला सुरुवात झाली आहे.

### ७५ कोटींचा खर्च

***कोपरा खाडीकिनाऱ्याचे गोवा येथील राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने सर्वेक्षण केले आहे. या ठिकाणच्या जैवविविधतेला धोका न पोहचवता हे सांडपाणी समुद्राच्या भरती-ओहोटीच्या क्षेत्राच्या पुढे समुद्रात सोडले जाणार आहे जेणेकरून ते वसाहतीलगत येणार नाही. या कामाकरिता ७५ कोटी ७४ लाख रुपये इतका खर्च होणार असून तळोजा औद्यागिक क्षेत्रातील वसाहतींमधून येणाऱ्या दुर्गंधीयुक्त पाण्याचा प्रभाव कमी होणार आहे.***

## मोरबे परिसरातील ४१ बंद घरांमधील नळांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये बंद ४१ घरांमधील नळांची चोरी झाल्याची घटना घडली आहे. तालुक्यातील मोरबे गावात घडलेल्या प्रकाराची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सहकार द्वारका रहिवासी संकुलात १२ इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे, तर तीन इमारतींचे बांधकाम सुरू आहे. सोसायटीत पाणी नियोजनाचे काम पाहणारे तुकाराम गायकर पाण्याचे टॅप सुरू करण्यासाठी जात असताना फ्लॅटचे कुलूप तोडण्यात आल्याचे दिसले. गायकर यांनी फ्लॅटमध्ये पाहिले असता बाथरूम, टॉयलेट, किचन, बेसिन आदींमध्ये नळ नसल्याचे लक्षात आले.

तब्बल ४१ फ्लॅटमधील ४२ हजार ३५० रुपयांचे नळ चोरीस गेल्याची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## करंजाडेत रोख रकमेसह मोबाईल चोरी

**पनवेल** : चोरट्याने घरात प्रवेश करून दोन मोबाईल व रोख रक्कम असा ४० हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेशनगर, करंजाडे येथील अनिश सोनकर यांनी सकाळी उठल्यानंतर त्यांनी मोबाईल पाहिला असता सापडला नाही. चुलत भावाचा मोबाईलही हरवल्याचे समोर आले. त्यांनी घराची पूर्ण पाहणी केली असता रोख रक्कमही लंपास केल्याचे आढळून आले.

## शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी रक्तदान शिबिर

**पनवेल** : खांदेश विकास फाउंडेशनच्या वतीने २६/११ मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील शहीद खांदेशचे सुपुत्र योगेश पाटील (मुंबई पोलीस) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खारघर येथील जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, सेक्टर १९ येथे रविवारी (दि. २६) सकाळी ९ ते २ या वेळेत हे शिबिर होणार आहे. इच्छुकांनी (९९६७६६१८६२, ९०२२५६४२१४, ८१०८८९१९९९, ९४२०६४५३८१) या क्रमांकावर संपर्क साधावा व जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पाण्याअभावी सागरी मार्गावरील नारळाची झाडे सुकू लागली

**उरण : प्रतिनिधी**



सिडकोने उरणला जोडणार द्रोणागिरी नोड ते पागोटे या पाच किमीच्या सागरी महामार्गावर जवळपास एक कोटी रुपये खर्च करून चार हजार नारळाच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे, मात्र पावसाळ्यानंतर ही नारळाची झाडे पाण्याविना सुकू लागली आहेत. त्यामुळे याकडे सिडकोने गांभिर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

सिडकोने द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांवर विविध प्रकारची झाडे लावण्याचा संकल्प शासनाच्या माझी वसुंधरा झाडे लावा झाडे जगवा या माध्यमातून हाती घेतला आहे. त्या धर्तीवर सिडकोने पागोटे-भेंडखळ- करंजा बंदर या द्रोणागिरी नोड परिसरातील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रस्त्यावर जवळपास नारळाची झाडे लावली आहेत. पावसाळ्यात योग्यरितीने पाऊस झाल्याने या झाडांना पाण्याचा तुटवडा निर्माण झाला नाही, मात्र सध्या दिवसा कडक ऊन पडू लागले आहे. या उन्हाच्या तडाख्यात ही झाडे पाण्याविना करपू लागली आहेत. त्यामुळे निसर्गमित्रांनी नाराजी व्यक्त केली आहे.

याबाबत शेतकरी अनंत ठाकूर यांनी सिडकोने कोस्टल मार्गावर नारळाची झाडे वाचविण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी केली आहे.





**पनवेल : बोनशेत येथील विनायक हरिश्चंद्र फडके याच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी श्री सत्यनारायण महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पनवेल भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शनाचा लाभ घेत विनायक फडके याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासह रवी नाईक, भूपेंद्र पाटील, सुनील पाटील तसेच फडके कुटुंबीय उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अंकित सुहास ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी त्यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी सुहास ठाकूर उपस्थित होते.**

**पनवेल : मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीतील वाघाचीवाडी, चिंचवाडी, टाऊरवाडी येथील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कार्यकर्ते सुनील पाटील, नवनिर्वाचित सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा, पत्रकार गणपत वारगडा, ज्येष्ठ कार्यकर्ते काळुराम वाघ, पदू वाघ, सदस्य अर्जून कांबडी, विष्णू पारधी, उषा वारगडा, वनिता वाघ आदी उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून या रस्त्याचे काम करण्यात येणार आहे.**



# पोलिसांच्या जल्लोष कार्यक्रमातील सहभागी कलाकारांचा सन्मान

## पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्याकडून कौतुक

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या वतीने जल्लोष खाकी वर्दीतील दर्दींचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सहभागी झालेल्या पोलीस अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा बुधवारी (दि. २३) आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले. अशाच प्रकारचे कार्यक्रम उपक्रम यापुढेही राबविण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचा कुटुंबातील सदस्यांच्या त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचा संकल्प नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केला. पोलीस कर्मचारी आणि अधिकारी ताणतणावातून बाहेर पडावे हा त्यामागचा उद्देश होता. त्यानुसार दीपावलीच्या अगोदर सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. सेलिब्रेटी आणि प्रोफेशनल कलाकारांची येथे कला सादर करण्याऐवजी नवी मुंबई पोलीस दलातील कर्मचारी, अधिकारी त्याचबरोबर कुटुंबातील व्यक्तीच कलाविष्कार सादर करतील अशी वेगळी कल्पना आयुक्त मिलिंद भारंबे यांनी मांडली आणि ती सत्यातसुद्धा उतरवली.

डिवाइनर प्रोडक्शनचे प्रमुख निशिकांत सदाफुले, निहारिका सदाफुले यांनी 'जल्लोष वर्दीतील दर्दींचा' हा कलाविष्काराचा कार्यक्रम दिग्दर्शित केला. वाशी येथील सिडको हॉलमध्ये पोलीस आणि त्यांच्या कुटुंबातील कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण करून एखाद्या रियालिटी शोला लाजवेल असा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

मराठी सिने कलाकार स्वप्निल जोशी यांनी उपस्थित राहून खाकी वर्दीतील कलेला प्रोत्साहन आणि पाठबळ दिले. दरम्यान जल्लोष २०२३मध्ये सहभागी झालेल्या कलाकारांना बुधवारी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पोलीस आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींमधील सुप्त गुण ओळखून त्यांच्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवण्याचा मानस पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी व्यक्त केला.

विशेषतः पोलीस पत्नी, मुले आणि मुलींना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. याची माहिती जमा करण्यासाठी चॅम्पियन नियुक्त करण्यात आल्याचेही आयुक्त मिलिंद भारंबे म्हणाले. या वेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त संजय कुमार पाटील आणि इतर अधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय

# लाखोलीनाट्य!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'पनौती' म्हणून हिणवल्यानंतर काँग्रेसने माफी मागणे दूरच राहिले, उलट मोदी यांना आता 'पनौती ए आझम' अशी अतिशय हीन पातळीवरची उपाधी दिली गेली आहे. काँग्रेसकडून मोदी यांची अशी नालस्ती होत असताना या सर्वांवर कडी केली आहे ती तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी! मोदी यांचा किती पराकोटीचा द्वेष ही नेतेमंडळी करतात हेच यातून दिसते.

**राजस्थानातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची धुळवड एकदाची गुरुवारी संपली, तेव्हा तेथील जनतेने सुटकेचा निःश्वासच सोडला असेल. पंतप्रधान मोदी यांचा काँग्रेसचे नेते किती पराकोटीचा द्वेष करतात याची झलक या प्रचारात पहायला मिळाली. कर्नाटकातील निवडणुकांमध्येही काँग्रेसच्या नेत्यांनी मोदींना 'विषारी साप' वगैरे म्हटले होते. राजस्थान, मध्यप्रदेशातील प्रचारात हा स्तर आणखी खाली नेण्याचे 'महान कार्य' काँग्रेसच्या नेत्यांनी केले आहे असेच म्हटले पाहिजे. गेल्या रविवारी अहमदाबादेत विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना झाला, तेव्हा तेथे उपस्थित राहिल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांना 'पनौती' म्हणून हिणवण्यापर्यंतची हिडीस पातळी खासदार राहुल गांधी यांनी गाठली. त्याच्या दोनच दिवस आधी त्यांच्याच भगिनी प्रियांका गांधी यांनी 'मोदी सतत रडत असतात' अशी टिप्पणी केली होती. राहुल गांधी यांनी केलेल्या मोदी यांच्या अपमानामुळे देशभरात संतापाची लाट उसळली, त्यात नवल नव्हते. भारतीय जनता पक्षातर्फेही गांधी बहीण-भावांचा यथोचित 'सत्कार' झालाच, पण भाजपच्या प्रत्युत्तराला काही एक सभ्य पातळी तरी होती. समाजमाध्यमांवरही राहुल गांधी यांच्याबाबत नाराजी व्यक्त करणारा खूप मोठा वर्ग होता. एवढी टीका होऊनही गांधी परिवार किंवा काँग्रेस पक्ष आपला उर्मट स्वभाव सोडायला तयार नाही, हे आश्चर्य आहे. सुंभ जळाला तरी पीळ गेला नाही हेच खरे. वास्तविक राहुल गांधी यांच्या कार्यकाळातच काँग्रेस पक्षाची एवढी वाताहत झाली की हा पक्ष आता मोदी यांच्या झंझावातात पाचोळ्यासारखा उडून जातो की काय, असे वाटू लागले होते. तसे पाहू गेल्यास काँग्रेस पक्षासाठी राहुल गांधी हेच 'पनौती' आहेत असे कुणी म्हटले तर वावगे वाटू नये. मोदी यांना पनौती म्हणून हिणवल्यानंतर काँग्रेसने माफी मागणे दूरच राहिले, उलट मोदी यांना 'पनौती ए आझम' अशी अतिशय हीन पातळीवरची उपाधी दिली गेली आहे. राहुल गांधी यांच्या बेलगाम वक्तव्याबाबत काँग्रेस नेत्यांनी सारवासारव केली असती, तरी समजून घेण्याजोगे होते. उलटपक्षी, राहुल गांधी यांचे वक्तव्य किती योग्य आहे हेच काँग्रेसचे नेते सांगू लागले आहेत. पनौती हा शब्द असंसदीय नाही, असेही समर्थन केले जात आहे. याला काय म्हणावे? गांधी परिवाराकडून मोदी यांची इतकी नालस्ती होत असताना या सर्वांवर कडी केली आहे ती तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी. त्यांनी तर मोदींना पापी म्हटले आहे. 'पापी लोक जेथे जातात, तेथे त्यांची पापेही पाठोपाठ येतात. म्हणून विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताचा संघ हरला' हे त्यांचे वक्तव्य हतबुद्ध करणारे आहे. ज्या देशाचे अंतराळयान चंद्र आणि सूर्याकडे झेपावते, त्या देशात ही शकुन-अपशकुनांची भाषा शोभत नाही. मोदी यांच्या नालस्तीची किंमत या नेत्यांना मोजावीच लागेल.**

# समुद्री घळई... एक अनोखी गुहा





समुद्र किनाऱ्यालगतचा खडकाळ भाग आणि त्यातून चालत जाऊन शेवटी समोर येणारा कातळी घळईचा भाग अगदीच अनटच वाटतो. आजही त्या खोल घळईमध्ये थेट उतरण्याचे धैर्य कुणा गिर्यारोहकाने केलेले नसावे, कारण ती एक निसर्गनिर्मित गुहा आहे. विशेषतः दर्या भरतीच्या वेळी जर का आपण गेलो तर उसळणाऱ्या लाटांचा जोम आणि जोश पाहून भीतीयुक्त आनंद मिळतो.

उसळत्या लाटा समोरील गुहेवर जाऊन कायम आदळतात आणि पाण्याचा सफेद फेस सर्वत्र पसरला जातो. एकांतातला तो कर्कश्य आवाज आणि तुडुंब पाण्याने भरून गेलेली ती खडकाळ गुहा अनेकांना लाईव्ह चित्रीत करण्यात एक वेगळाच आनंद मिळू शकेल. सुमारे २० वर्षांपूर्वी स्थानिक मच्छीमार मित्रासमवेत घळईपर्यंतची खडकाळ सफर स्वतः केल्याचे आठवते. सोबतीला कॅमेरा होताच, जो प्लॅस्टिकमध्ये गुंडाळून घ्यावा लागला, कारण समुद्री लाटा उसळी घेऊन अंगावर येण्याची शक्यता असते आणि तसे झालेसुद्धा.

बर्म्युडा आणि टी-शर्ट डोक्यात टोपी, जमल्यास ग्लेअर्स. बिस्लेरीची बॉटल आणि खायला पारले जी बिस्किट्स. हातात एक काठी पायात



छायाचित्र : जलील नाखवा

पावसाळी बुट्स. अशाप्रकारे ती खडकाळ पायवाट तुडवून घळईपर्यंत पोहचता येते. चालताना मध्येच रंगीबेरंगी खेकडेसुद्धा दिसतात. त्यांची अनोळखी लगबग सुरू असते. खुबीतला जीव कासवागत आतबाहेर होताना दिसतो. मध्येच खडकात तयार झालेल्या पळात (खड्ड्यात) साचलेल्या पाण्यावर रंगीत तेल तरंगताना दिसते. त्यावर समुद्री जीवसुद्धा निवांत पसरलेले दिसतात. पर्यटकांनी याचे सूक्ष्म निरीक्षण करीत जावे. मोबाईलने अपेक्षित फोटो क्लिक करीत रहावे.

ग्रामदेवता श्री पाथरा देवीमंदिरापासून जी पायवाट सुरू होते तो एक अद्‌भूत प्रवास होय. अर्थातच समुद्रकिनारी राहणाऱ्या मच्छीमारांची टुमदार घरे आहेत. त्यातच मोहोल्ल्यात वसलेल्या शेतकऱ्यांची घरे आहेत. ते शेती करतात हे मासे आणतात... पोटापाण्याचा विषय इथेच येऊन थांबतो. घळई एक अद्‌भूत गुहेपर्यंत जाणारी पायवाट कुणा संस्थेने किंवा प्रशासनाने तयार केलेली नसून अनादी काळापासून मळली गेलेली ती पायवाट उठून दिसते. प्रशासनाने त्या वाटेच्या प्रारंभी एक फलक लावून दिशा निर्देश करावा. हा प्रवास खरंतर काहीसा जोखमेचा असून त्याद्वारे स्वनिर्णयी पाऊल टाकावे, कारण उजवीकडे अथांग अरबी समुद्र आहे तर खडकास लागून उंच असा अरण्ययुक्त डोंगर आहे. खालून डोंगर शिखर थेट आकाशी जाऊन भिडलेले असावे असा भास होऊ शकतो. त्याच डोंगराच्या पायथ्याशी म्हणे एक वाघबिळ आहे असे ऐकिवात आहे. त्यात अर्थातच वाघांचा निवास असावा, पण मी स्वतः प्रत्यक्षात ते वाघबिळ कधीच पाहिलेला नाही. असो, जर कधी वाघांचे दर्शन झालेच तर यापुढे जंगल सफारी म्हणून वेगळा लेख लिहावा लागेल.

तूर्तास तरी पंचनदी पंचक्रोशीतील लखडतर या गावाचे विशेष आकर्षण असेल तर ते म्हणजे अरबी समुद्राच्या सान्निध्यात असलेला हा खडक आणि लाटांच्या आक्रोशाने आपसूक निर्माण झालेली ती खडकाळ गुहा, ज्यामध्ये आपलाच आवाज इको बनून हवेत कंपन तयार करत असतो. अशी ती निसर्गरम्य जागा यापुढे पर्यटकांनी आणि त्यातल्या त्यात ट्रेकिंगच्या चाहत्यांनी नक्कीच निवड करावी. शासनानेसुद्धा पर्यटनाच्या दृष्टीने इकडे लक्ष द्यावे.

लखडतर घळईकडे येण्याचा मार्ग दापोली ते तिठ्ठा लगत असलेल्या रस्त्यावरुन माघारीमार्गे गाडी लईव्ह करून पोहचता येते. हा किनारा तसा स्वछ असून त्याकडे घोडा-उंट गाड्या नसून, पायी चालणाऱ्यांना खरी मजा येईल. चाट, चायनीजसारख्या आधुनिक खाद्य पदार्थांची रेलचेल या जागी नाही मिळणार तरीही निसर्गाने दाखविलेला चमत्कारी स्पॉट म्हणजेच ही खडकाळ गुहा, ज्यास स्थानिक लोक घळई या नावाने ओळखतात. तरुणाईला भावणारे हे दृश्य आणि निसर्ग थरार निश्चितच आकर्षित करू शकेन.

**-इकबाल शर्फ मुकादम,**
दापोली, रत्नागिरी

## बदलते तंत्रज्ञान




# गुगल पेवर कॅशबॅकसाठी वापरा 'या' ट्रिक्स

गेल्या काही दिवसांपासून गुगल पेमेंट मिळणारे भरघोस कॅशबॅक बंद झाल्याने ग्राहक नाराज झाले आहेत. त्याचप्रमाणे मिळणारे रिवॉर्ड्सही फारसे वापरले जात नसल्याने अनेकजण गुगल पे आता वापरायचे की नाही या विवंचनते आहेत, पण गुगल पेमेंट वापरूनही तुम्हाला कॅशबॅक रिवॉर्ड मिळत नसेल, तर आज आम्ही तुम्हाला असे काही मार्ग सांगणार आहोत, ज्याद्वारे ही समस्या दूर होईल आणि तुम्ही प्रत्येक पेमेंटवर कमाई करू शकता.

तुम्हाला जी-पेवर मोठा कॅशबॅक मिळवायचा असेल, तर त्यासाठी तुम्हाला एक महत्त्वाची टिप फॉलो करावी लागेल. खरेतर तुम्ही पेमेंट करता तेव्हा वेगवेगळ्या नंबरवर पैसे देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा तुम्ही एकाच नंबरवर पेमेंट करता, तेव्हा कॅशबॅक जिंकण्याची शक्यता खूपच कमी असते. त्यामुळे वेगवेगळ्या खात्यांवर पैसे पाठवा आणि कॅशबॅक मिळवा.


गुगल पेमेंट करताना तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की, एकाच वेळी खूप मोठे पेमेंट पाठवण्याऐवजी त्याचे छोटे विभाग करून दोन किंवा तीन वेळा पाठवा. असे केल्याने कॅशबॅक रिवॉर्ड मिळण्याची शक्यता जास्त आहे.

आपण सर्वांनी गुगल पेवर विविध प्रकारचे कुपन पाहिले असतीलच. जर तुम्हाला चांगल्या कॅशबॅकचा लाभ घ्यायचा असेल तर ही कुपन नक्कीच खरेदी करा आणि मग तुम्हाला चांगला कॅशबॅक मिळेल आणि तुम्ही हजारो कमवू शकाल.

रिचार्ज केल्यानंतरही तुम्ही कॅशबॅक जिंकू शकता, त्यामुळे जेव्हा तुम्हाला तुमच्या फोन, ब्रॉडबँड किंवा डीटीएचसाठी पैसे द्यायचे असतील तेव्हा ते फक्त गुगल पेने पैसे पाठवा. याद्वारे तुम्ही कॅशबॅक जिंकू शकता.

गुगल पेमेंटवर अनेक गेम आणि ऑफर थोड्या अंतराने सुरू होतात. जर तुम्हाला कॅशबॅकचा लाभ घ्यायचा असेल, तर त्यात सहभागी, व्हा जेणेकरून तुम्ही पेमेंट दरम्यान जास्तीत जास्त कमाई करू शकता.

# नाट्यतपस्वी भालचंद्र पेंढारकर



## निमित्त


भालचंद्र व्यंकटेश पेंढारकर ऊर्फ अण्णा पेंढारकर हे मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ नाट्य-अभिनेते, दिग्दर्शक, नाट्य-निर्माते आणि नेपथ्यकार होते. त्यांचा जन्म २५ नोव्हेंबर १९२१ रोजी हैदराबादमध्ये झाला. भालचंद्र पेंढारकर अर्थात अण्णा हे अत्यंत व्यासंगी, शिस्तबद्ध आणि रंगभूमीवर अमाप श्रद्धा असणारे रंगकर्मी होते. ते मेहनतीला कोठेही कमी पडत नसत. जेव्हा बालपणी त्यांनी निश्चय केला की आपल्याला गाणं शिकायचंय, त्यासाठी रात्रीचा दिवस केला. त्यांची आजी व आई त्यांना बापूराव पेंढारकरांच्या मृत्यूनंतर जेव्हा मुंबईला घेऊन आली, तेव्हा बापूरावांच्या चाहत्यांनी 'पेंढारकर ट्रस्ट' उभा केला.

अण्णांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी सांगितलं. त्या वेळी त्यांनी फक्त औपचारिक शिक्षण घेण्यास नकार दिला. त्यांना संगीताचं शिक्षण घ्यायचंच होतं. त्यांच्या आजी व आईनं त्यांना पूर्ण पाठिंबा दिला. रोज सकाळी ५ ते ८ रियाज, मग पर्वतीवर व्यायाम, १० ते १२ शिकवणी, जेवण, पुन्हा संध्याकाळी ३ ते ८ शिकवणी. मग रात्री कुठेतरी गाण्याचा कार्यक्रम ऐकायला जायचं असं पाच वर्षं सुरू होतं. ते दिवस खूप आर्थिक चणचणीचे होते. घरी आजी, आई आणि तीन लहान बहिणी. त्यातील दोन अपंग व अण्णा. एकच धोतर होतं त्यांच्याकडे. ते रात्री धुवायचे, पंचावर निजायचे अन् दुसऱ्या दिवशी पहाटे वझेबुवांकडे पळायचे. हेही दिवस सरले. रेडिओच्या कामानिमित्ताने बाबुराव देसाई यांची भेट झाली. त्यांना अण्णांची स्थिती समजली. देसाईंनी संपूर्ण कुटुंबासह अण्णांना मुंबईत आपल्या घरी राहायला बोलावलं. 'ललितकलादर्श'चं पुनरुज्जीवन करायला लावलं आणि त्यासाठी संपूर्ण आधार दिला.

ललितकलादर्श या नाट्यक्षेत्रातील प्रतिष्ठित संस्थेचे प्रमुख या नात्याने त्यांनी अनेक संगीत नाटके रंगभूमीवर सादर केली. त्यात 'संगीत सौभद्र'सारखी पूर्वी गाजलेली नाटके होतीच, शिवाय 'पंडितराज जगन्नाथ', 'दुरितांचे तिमिर जावो', 'बावनखणी', 'जय जय गौरीशंकर', 'आनंदी गोपाळ' या नव्या नाटकांचाही समावेश होता. अभिनयासोबतच दिग्दर्शन, नेपथ्य, छायाचित्रण, नाट्य निर्मिती अशा अनेक क्षेत्रांत पेंढारकर लीलया वावरले. गिरगावच्या साहित्य संघातील त्यांचा वावर अनेक कलावंतांना मार्गदर्शक ठरला.


पेंढारकर यांनी संगीत, गद्य अशा सुमारे ५१ नाटकांमध्ये भूमिका केली होती. त्यांनी ललितकलादर्श संस्थेमार्फत १४ नाटकांची निर्मिती केली. विजय तेंडुलकर लिखित 'झाला अनंत हनुमंत', भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवरील 'रक्त नको मज प्रेम हवे' हे सुरेश खरे लिखित नाटक तसेच डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरील 'आनंदी-गोपाळ' ही त्यातील काही प्रमुख नाटके होती. पेंढारकर यांच्यावर ग्वाल्हेर गायकीचे संस्कार झाले होते. 'आई तुझी आठवण येते', 'जय जय गौरीशंकर' नाटकातील 'रमारमण श्रीरंग' ही त्यांच्या संगीत नाटकातील पदे अतिशय लोकप्रिय झाली. १९५५मध्ये प्रदर्शित 'अमर भूपाळी' चित्रपटात होनाजी यांची भूमिका पंडित नगरकर तर बाळा यांची भूमिका भालचंद्र पेंढारकर यांनी केली होती. अशा या नाट्यतपस्वीचे ११ ऑगस्ट २०१५ रोजी निधन झाले.

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : कर्नाळा किल्ल्याच्या अंगठ्यासारख्या आकारामुळे हा किल्ला वेगळा वाटतो. पक्षी अभयारण्यामुळे हा किल्ला प्रसिद्ध आहे. अनेक पर्यटक या किल्ल्याला भेट देत असतात.**

## आरोग्य प्रहर



# थंड झालेला चहा पुन्हा गरम केल्यास होतात 'हे' परिणाम

आपल्यापैकी अनेकजणांना सकाळी उठल्या उठल्या चहा हा लागतोच. चहाची तल्लफ असलेले बरेच सापडतील आपल्याला. अस्सल चहाबाज चहासाठी कायम टपरीवरच्या चहाला पसंती देतात, परंतु अनेक लोक चहा बनवण्यात आळस करतात. ज्यामुळे एकदाच मोठ्या प्रमाणात चहा बनवून ठेवतात आणि तो वेळोवेळी गरम करून पितात, परंतु वारंवार गरम करून चहा प्यायल्याने आरोग्याचे मोठे नुकसान होते. त्यामुळे चहा वारंवार गरम करून पिऊ नये. जाणून घेऊया तयार झालेला चहा पुन्हा गरम करून का पिऊ नये...

**आरोग्यासाठी हानिकारक** : एकदाच तयार केलेला चहा पुन्हा पुन्हा गरम करून पिणे आरोग्यासाठी घातक आहे कारण त्यात असलेले पोषक तत्त्व नष्ट होतात. जर तुम्ही ही सवय बदलली नाही तर बराच वेळानंतर पोटदुखी, जळजळ होऊ शकते. ही सवय तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. त्यामुळे पुन्हा पुन्हा चहा गरम पिणे टाळणे योग्य ठरेल.

**चव आणि वाईट वास** : चहा पुन्हा पुन्हा गरम केल्याने त्याची चव आणि सुगंध नष्ट होतो. या दोन्ही गोष्टी चहामध्ये खास आहेत. याशिवाय चहा पुन्हा पुन्हा गरम केल्याने त्याचे पोषक घटकही कमी होतात.

**जीवाणूंची वाढ** : एकदाच चहा तयार करून पुन्हा पुन्हा पिणे आरोग्यासाठी हानिकारक आहे कारण चहामध्ये सूक्ष्मजीव तयार होऊ लागतात. हे सौम्य जीवाणू आरोग्यासाठी हानिकारक असतात. ज्या घरांमध्ये दुधाचे प्रमाण जास्त असते तेथे दुधाचा चहा बनवला जातो. यामुळे सूक्ष्मजीव धोका वाढतो. त्याचवेळी हर्बल चहा वारंवार गरम केल्याने त्याचे पोषक घटक नष्ट होतात.

**टॅनिन बाहेर निघून जाते** : जर तुम्ही चहाप्रेमी असाल, तर तुम्हाला चवीत कोणतीही तडजोड आवडणार नाही पण जर तुम्ही चहा बराच काळ तसाच ठेवला तर ते टॅनिन सोडते, ज्यामुळे चहाची चव पूर्णपणे कडू होते. अशावेळी चहा तुमच्या तोंडाची चवदेखील खराब करेल.

# रोह्यातील बाल्हे, हंडेवाडी पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू

## भाजप नेते रवींद्र तारु यांच्या पाठपुराव्याला यश



**धाटाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चिंचोली तर्फे हद्दीतील बाल्हे, हांडेवाडी येथे जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाणी योजनेचे काम गेल्या ११ महिन्यांपासून ठप्प झाले होते. याविरोधात भाजपचे नेते रवींद्र तारु यांनी उपोषणाचा इशारा दिला होता. याची गंभीर दखल घेऊन पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी या परिसरात तातडीने कामाची पाहणी केली. ठेकेदाराला काम सुरू करण्याचे निर्देश दिले व ठेकेदाराने हे काम सुरूदेखील केले.

भाजप नेते रवींद्र तारू यांनी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे व संबंधित अधिकारी तसेच भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले.

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चिंचोलीतर्फे आतोणे हद्दीतील बाल्हे, हंडेवाडी येथे जलजीवन मिशन योजनेंतर्गत काम गेल्या ११ महिन्यांपासून ठप्प आहे. शासनाचे आदेश असूनही ठेकेदार काम सुरू करीत नाही. रोहा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने अशा ठेकेदारावर त्वरित कठोर कारवाई करून पाणीयोजनेचे काम सुरू करावे अन्यथा महिलांचा हंडा मोर्चा काढू. वेळप्रसंगी उपोषणाला बसू, असा इशारा भाजप नेते रवींद्र काशिनाथ तारू यांनी दिला होता. त्यांच्या या मागणीची दखल घेत पंचायत समिती ग्रामीण पाणीपुरवठा अधिकारी अभियंता जागृती माळी यांच्यासह व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तातडीने पाणीपुरवठा योजनेच्या कामाची पाहणी करून ठेकेदारांने कामदेखील सुरू केले. त्यामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.

डिसेंबर अखेरीस पाण्याची टाकी व पाईपलाईनचे काम पूर्ण होईल असे अभियंता जागृती माळी यांनी सांगितले आहे, तर या कामात पूर्णपणे गावकऱ्यांचे सहकार्य असून हे काम जलद गतीने करून घेऊ, असे भाजप नेते रवींद्र तारु यांनी सांगितले.

## मुरूड समुद्रकिनारा सुशोभीकरण अंतिम टप्प्यात

### ११ कोटी रुपये खर्चून बांधला जातोय संरक्षक बंधारा



**मुरूड : रामप्रहर वृत्त**

येथील समुद्रकिनाऱ्यावर संरक्षक बंधारा उभारण्यात येत आहे. या ठिकाणच्या सुशोभिकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच हा बंधारा स्थानिकांसह पर्यटकांसाठी खुला करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी दिली.

मुरूडच्या संरक्षक बंधाऱ्यासाठी ११ कोटी ५० लाख रुपये खर्च केले जात आहेत. संरक्षक भिंत उभारताना किनाऱ्यावर सुशोभिकरणासह पर्यटकांसाठी सोयीसुविधा विकसित करण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चेंजिंग रूम, वॉच टॉवर, आकर्षक फूड स्टॉल, पर्यटकांना बसण्यासाठी सर्वोत्तम आसन व्यवस्था करण्यात येणार आहे.

समुद्र किनाऱ्यापासून फक्त १० फुटांवर गाडी पार्क करून समुद्र पर्यटनाचा आनंद लुटता येणार नाही. मोठ्या संख्येने पर्यटक आले, तरी मुख्य रस्त्यावर गर्दी होणार नाही, असे नियोजन करण्यात येत असल्याकडे भुसे यांनी लक्ष वेधले.

# सावरोली-खारपाडा राज्यमार्गावरील मैलाचे दगड कोरे; प्रवाशांचा गोंधळ

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रवासात एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी असलेले अंतर दाखवणारा महत्त्वाचा मैलाचा दगड कोराच असल्याने सावरोली-खारपाडा राज्यमार्गावरून प्रवास करताना प्रवाशांचा गोंधळ होत आहे.

राष्ट्रीय मार्ग, राज्यमार्ग तसेच जिल्हा मार्गाची ओळख दर्शवणारे, विशिष्ट रंगात रंगवलेले मैलाचे दगड गुगल नकाशाच्या जमान्यातदेखील विश्वासार्हता टिकवून आहेत. खालापूर तालुक्यात राष्ट्रीय मार्ग, द्रुतगती मार्ग, राज्यमार्गाचे जाळे आहे. मुंबई-पुणे महानगराचा मध्यबिंदू असलेला खालापूर तालुक्यातून दररोज लाखो वाहन धावतात. प्रवासात मार्गदर्शक ठरणारा मैलाचा दगडावरील माहितीमुळे गाव, अंतर तसेच आपला प्रवास योग्य वाटेवरून सुरू असल्याची खात्री पटत असते. तालुक्यातील सावरोली खारपाडा राज्यमार्ग हा मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्ग, खोपोली-पेण आणि खोपोली-पाली राज्यमार्गाला जोडलेला आहे. सावरोली-खारपाडा राज्यमार्गाचे तीन वर्षांपूर्वी दुरुस्ती तसेच मजबुतीकरण पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील मैलाचे दगडाचीदेखील रंगरंगोटी करण्यात आली, परंतु त्यावर गावाचे ठिकाण आणि किमी आकडे टाकण्याचा मात्र विसर सार्वजनिक बांधकाम विभागाला पडला आहे.

सावरोली चारफाटा ते पाताळगंगा औद्योगिक वसाहत या २० किमी अंतरात जागोजागी असलेले मैलाचे दगड कोरेच आहेत. मैलाचे दगडावर परिपूर्ण माहिती देण्यात यावी अशी मागणी खालापूर प्रवासी संघाच्या अध्यक्षा भाग्यश्री शिंदे यांनी केली आहे.



# भाजप महिला मोर्चा प्रदेश चिटणीसपदी यशोधरा गोडबोले



**माणगाव : प्रतिनिधी**

भाजप महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश चिटणीसपदी माणगाव येथील यशोधरा गोडबोले यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष महिला मोर्चा चित्रा वाघ यांनी करून त्यांना नियुक्तीपत्र आपल्या सहीनिशी दिले आहे. यशोधरा गोडबोले यांची भाजप पक्षाच्या महिला मोर्चा प्रदेश चिटणीसपदी नियुक्ती झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

यशोधरा गोडबोले या भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्या असून त्यांनी भाजपचे माणगाव तालुका महिला मोर्चाचे अध्यक्ष तसेच तालुका उपाध्यक्ष म्हणून गेली नऊ वर्षे काम केल्याने पक्ष नेतृत्वाने त्यांना बढती देऊन राज्यावर मानवाधिकार सेक्रेटरी म्हणून काम करण्याची संधी सलग दुसऱ्यांदा दिली आहे. शिवाय नुकतीच महाराष्ट्र प्रदेश भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी माणगावच्या यशोधरा गोडबोले यांची भाजपच्या महिला मोर्चा प्रदेश चिटणीसपदी नियुक्ती केली असून आहे. प्रदेश भाजप महिला मोर्चाच्या सचिव म्हणून भाजप संघटनतर्फे यशोधरा गोडबोले यांचे स्वागत व अभिनंदन केले आहे.

यशोधरा गोडबोले म्हणाल्या की, पक्षश्रेष्ठींनी माझ्यासारख्या महिला कार्यकर्त्यावर प्रदेशवर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने मी सर्व पक्षश्रेष्टींचे मनापासून आभार व्यक्त करीत आहे. संघटना वाढीबरोबरच बहुजन समाजातील जनतेला आजपर्यंत ज्या पद्धतीने शासनाच्या विविध लोकाभिमुख योजनांचा लाभ मिळवून दिला आहे, तसा लाभ या जनतेला यापुढेही मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेन.

# अलिबागमध्ये उद्या संविधान जागर यात्रा

**अलिबाग : प्रतिनिधी**

संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान जागर समिती, अलिबागतर्फे रविवारी (दि. २६) शहरात संविधान जागर यात्रा काढण्यात येणार आहे. संविधान यात्रेची तयारी पूर्ण झाली आहे. ही माहिती समितीचे अलिबाग निमंत्रक प्रा. अरविंद निगळे यांनी शुक्रवारी (दि. २४) पत्रकार परिषदेत दिली. प्रा. डॉ. पी. बी. आचार्य, बी. जी. पाटील आणि प्रा. डॉ. उत्तम गाढे या वेळी उपस्थित होते.



भारतीय राज्यघटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वतंत्र भारताचे संविधान राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सुपूर्द केले. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस भारतात संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. अलिबाग शहारातील डॉ. आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करून २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. संविधान जागर यात्रेला प्रारंभ होईल. शहारातील मुख्य रस्त्यांवरून ही यात्रा जाईल.

जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ दुपारी १ वा. हिराकोट तलाव येथे यात्रेची सांगता होईल. या संविधान जागर यात्रेत नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

**नमुना एन. डी.**

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. 987/MH46/02/2012 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 E 2216 चे मालक **चंद्रकांत काशिनाथ पाटील** यांचे तारीख ०७/०४/२०१७ रोजी निधन झालेले आहे.

मी मंदा चंद्रकांत पाटील, पत्ता : रा. पागोटे, पो. जेएनपीटी ता. उरण, जि. रायगड-४००७०७ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - मंदा चंद्रकांत पाटील**
**पत्ता- मु. पागोटे, पो. जेएनपीटी,**
**ता. उरण, जि. रायगड, ४००७०७**


# उसर येथे स्टोअर इन्चार्जला शिविगाळ; एकावर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील उसर येथे सोम प्रोजेक्ट कंपनीच्या स्टोअर इन्चार्जला शिविगाळ, दमदाटी व धक्काबुकी केल्याचा प्रकार घडला आहे. या स्टोअर इन्चार्जच्या तक्रारीनुसार रेवदंडा पोलीस ठाणे येथे एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उसर येथे सोम प्रोजेक्ट कंपनीच्या स्टोअर इन्चार्ज बिरेश कुमार नाहरसिंग यादव (वय ४५, मुळ रा. मुंडा खेडा, उत्तर प्रदेश सध्या रा. उसर) यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीनुसार, कंपनीमध्ये मागील वर्षी खानाव येथील संतोष रमेश पाडेकर कामावर आल्यानंतर काहीही काम करीत नसे व सुपरवायझरसोबत भांडण करीत असल्याने त्यास काढून टाकण्यात आले, मात्र संतोष पाडेकर हा पगार मागत होता. कंपनीने त्याला पगार दिला नाही. या गोष्टीचा राग मनात धरून कंपनीचे काम बंद करण्याचा हेतूने कंपनी गेटसमोर येऊन कंपनीचा कच्चा माल घेऊन येणारी वाहने अडवून व कंपनीचे गेट बंद करून फिर्यादी बिरेश कुमार नाहरसिंग यादव यांना शिविगाळ, दमदाटी केली. याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे संतोष रमेश पाडेकर यांचे विरोधात भादंवि. कलम ३४१,३२३,५०४,५०६ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास हवालदार दिनेश पिंपळे हे करीत आहेत.

# संत शिरोमणी नामदेव महाराजांची जयंती



**मुरूड : प्रतिनिधी**

देशभर भागवत धर्माची पताका फडकावणाऱ्या संत श्रेष्ठ नामदेव महाराजचा जन्म विश्वकल्याणासाठीच झाला. नामदेव महाराजांनी लिहिलेले अभंग विश्वातील वैज्ञानिक अभ्यास करण्यासाठी वापरात यावरून नामदेव महाराजांची वैचारिक उंची किती श्रेष्ठ होती असे विचार प्रवचनात भागवताचार्य हभप श्री. ज्ञानेश्वरदास महाराज सावर्डेकर, आळंदी यांनी मांडले.

कार्तिकी एकादशीनिमित्त शिंपी समाजाने नामदेव महाराजांचा जयंती सोहळा उत्साहात झाला. त्या वेळी ते मार्गदर्शन करीत होते.

सकाळी विठ्ठल रखुमाई मूर्तीवर दही, दुधाचा अभिषेक करण्यात आला. नंतर नामदेव गाथेचे परायण करण्यासाठी समाज बांधव बसले. समाजाचे अध्यक्ष विजय करंबे, प्रसाद कजबजे, भाई लाखामदे, राजू कजबजे, सुरेश सदरे, सिद्धेश करंबे, दर्शन काळंबेरं, प्रदीप बागडे, अरुण बागडे, सिद्धेश लखामदे, संतोष लखामदे आदी शिंपी समाजाच्या महिला वर्ग मोठा सहभाग घेतला.

सायंकाळी समाजबांधवांनी भजन करून संत नामदेवांचे अभांग गाऊन खऱ्याअर्थाने नामदेवांचे स्मरण केले. नंतर भागवताचार्य हभप श्री. ज्ञानेश्वरदास महाराज सावर्डेकर आळंदी यांचे नामदेव महाराज चरित्रपर प्रवचन झाले. प्रवचात समाज बांधव रंगून गेले व रात्री सोहळ्याचा समारोप सहभोजनाने करण्यात आले.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**जाहीर दर देणेबाबत**

**सूचना क्र :**पमपा/सा.बां.(उद्यान)/६६२३/प्र.क्र.२५/८७४/२०२३ दिनांक : २४/११/२०२३

पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणचे उद्याने सिडकोकडून हस्तांतरीत झालेली आहेत. सदरची काही उद्याने विकसित करणेचे काम प्रगतीपथावर असून लोखंडी स्टील कॅबिन (टॉयलेट सहित) पुरवठा करून प्रस्तावित ठिकाणी बसविणेकरीता e- SSR मध्ये नसलेल्या बाबींचे दर देणे बाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या https://www.panvelcorporation.com/ या संकेतस्थळावर दिनांक २४/११/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**टिप :-**

१. याबाबत सविस्तर सर्व तपशिल पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.
२. याबाबत काही माहिती हवी असलेस पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम (उद्यान) विभागाची संपर्क साधावा हि विनंती.
३. उपरोक्त नमूद सर्व बाबींचे दर या कार्यालयात दिनांक ०४/१२/२०२३ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत समक्ष सिलबंद सादर करावेत.

**सही/-**
**(डॉ. वैभव विधाते)**
उप आयुक्त (उद्यान)
पनवेल महानगरपालिका, पनवेल

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| अनु. क्र | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९४ | १७ | ०-०३-०<br>पो.ख. ०-०१-०<br>**एकुण ०-०४-०** | ०.०६ | १.सविताकुमारी चोप्रा,<br>२.अमित शिवकुमार चोप्रा. |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल. **सही/-**
दिनांक :- २५/११/२०२३ **ॲड. एस. के. राणे**

पत्ता : ऑफिस नं. १२३, पहीला मजला, म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्कट जवळ, पनवेल, जि. रायगड, मो. ९८१९८६९२१२

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय**
रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,
सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन - ४०२१०७

Email : elraigad.ee@mahapwd.gov.in / elraigad.ee@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८
Website : www.mahapwd.gov.in

जा क्र. का. अ./राविवि / निविदा -१ / ४५४८ / सन २०२३ दिनांक : २२.११.२०२३

**फेर ई-निविदा सुचना क्र. २३ सन २०२३-२४**

**संदर्भ : १.** महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/ इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड,** पिन कोड - ४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता. पेण, जि.रायगड, पिन कोड - ४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८** यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रु. | ई निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक/ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | **Est.No.RAESD/ OW/744/2023-24** SITC of Mortuary with 24 body SS Racks at Panvel Hospital, Tal-Panvel Dist-Raigad | रु. 69,90,598/- | दिनांक 01.12.2023 सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक ०६.१२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | १. Prime Contractor should have Valid Electrical Contractor License issued by Govt. of Maharashtra.<br>२. ठेकेदारांचा वर्ग अ व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात.<br>३. लिफाफा क्र. १ मध्ये सदर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. इसारा रक्कम रु.७००००/- निविदा शुल्क रु. १०००/- अधीक १८% वस्तु व सेवा कर रु.१८०/- **एकुण रु.११८०/-** | दिनांक ११.१२.२०२३ |

**खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

1. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३- २९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.१ मध्ये जोडण्यात यावे)
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.

**सही/-**
**(सं.ध. कट्टी)**
कार्यकारी अभियंता,
रायगड विद्युत विभाग, सा.बां.पेण-रायगड

विमाका/कोवि/२०२३-२०२४/२२६

# मेट्रोमुळे तळोजाकरांचा प्रवास सुखकर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

तळोजा ते खारघर रेल्वेस्थानक गाठण्यासाठी वसाहतीमधील प्रवाशांना एनएमएमटी, रिक्षा तसेच खासगी वाहनांशिवाय पर्याय नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे तसेच मर्यादित खासगी वाहनांमुळे दाटीवाटीने प्रवास करणाऱ्याची वेळ रहिवाशांवर आली होती. अशात नवी मुंबई मेट्रो सुरू झाल्याने तळोजाकरांचा प्रवास अधिक सुखकर झाला आहे.



तळोजा ते खारघर रेल्वेस्थानक दरम्यान एनएमएमटीसाठी १८ आणि वातानुकूलित बससाठी २३ रुपये आकारले जाते, तर रिक्षामीटरप्रमाणे १३० ते १४० रुपये आणि ईको शेअर टॅक्सी खारघर रेल्वेस्थानक ते शीघ्र कृतीदलाकरिता २५ ते ३० रुपये आकारले जातात.

एनएमएमटीच्या फेऱ्यादेखील मोजक्याच असतात, तसेच ईको गाडीदेखील पूर्ण भरल्याशिवाय पुढे जात नाही. रिक्षाभाडे सर्वसामान्यांना परवडणारे नसल्याने मेट्रो सेवा सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी सेवा ठरणार आहे. अशातच आता दर १५ मिनिटांनी मेट्रो पेंधर ते बेलापूरदरम्यान धावणार आहे. त्यामुळे खारघर आणि तळोजामधील रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.

तळोजा नोडमधील रहिवाशांना खारघर अथवा पुढे नवी मुंबई गाठण्यासाठी कसरत करावी लागत होती. मेट्रो सुरू झाल्याने तळोजा नोडमधील रहिवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे, असे स्थानिक व्यक्तींनी सांगितले.

### स्वस्त, मस्त पर्याय

मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे परिसरात नोकरी व्यवसाय करणारे प्रवासी बेलपाडा मेट्रो स्थानकावरून खारघर रेल्वेने प्रवास करतात. तळोजा-पेंधर ते बेलपाडा मार्गावर मेट्रोच्या तिकिटाचे दर ० ते २ किमीच्या टप्प्याकरिता १० रुपये, २ ते ४ किमीकरिता १५ रुपये, ४ ते ६ किमीकरिता २० रुपये, ६ ते ८ किमीकरिता २५ रुपये, ८ ते १० किमीकरिता ३० रुपये आणि १० किमीपुढील अंतराकरिता ४० रुपये असा आहे.

## मेंढ्या सांभाळताना धनगरांची तारेवरची कसरत



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मेंढपाळ आपल्याजवळ असलेला संसार घेऊन कोकणात येत असतात. कोकणातील बहुतेक शेतकरी शेती करीत असल्यामुळे घाटमाथ्यावरील मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेऊन कोकणाकडे प्रस्थान करीत असल्याचे चित्र सर्वच ठिकाणी पहावयास मिळत आहे, मात्र मेंढ्या घेऊन येतांना मेंढपाळांना तारेवरची कसरत करावी लागते.

रस्त्यावर सातत्याने रहदारी, वाहने यापासून मेंढ्या सांभाळणे मोठ्या कष्टाचे होत असतानाही वडिलोपार्जित व्यवसायाला लागलेली भटकंती करावीच लागत असल्याचे मेंढपाळांनी सांगितले.

मेंढ्या ज्या शेतात बसल्या जातात. त्यांच्या विष्ठेपासून शेतीला मोठ्या प्रमाणात खत मिळत असल्याने यामुळे जमिनीचा कस वाढण्यास मदत होत असते. शिवाय उत्तम पिक येत असते. यामुळे सध्या खालापूर, कर्जत, चौक अशा अनेक ग्रामीण भागाच्या ठिकाणी शेतकरी मेंढपाळांचे स्वागत करीत असल्याचे दृश्य आपणास पहावयास मिळत आहे. भातशेती कापली की, कापलेल्या जागी नवीन गवत उगवत असतात. हेच कोवळे गवत मेंढ्यांचे खाद्य असते. पावसाच्या पाण्यावर अनेक प्रकारच्या काटेरी वनस्पती वाढलेल्या असतात.

या काटेरी वनस्पतीपासून मेंढ्यांना सकस आहार मिळत असतो. शिवाय या खाद्यामुळे दुध व्यवसायही तेजीत चालतो. सध्या कोकणामध्ये औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे हवे तसे खाद्य उपलब्ध होत नाही. शिवाय मेंढ्या आजारी पडण्यांचे प्रमाण वाढले आहे, मात्र असले तरी पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या या व्यवसायाला खंड पडू नये यासाठी मेंढ्यापालन केले जात असल्याचे मेंढपाळांनी सांगितले.

## उलवे-नेरूळ उड्डाणपुलावर अपघात; दोघे गंभीर जखमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मनपा मुख्यालय इमारतीसमोर असणाऱ्या उलवे उड्डाणपुलावर कार आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील दोघांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

उलवेकडून गुरुवारी रात्री ९.४५ वा. च्या सुमारास नेरूळच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या कारचालकाने समोरील ट्रकला मागून जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की, कारचे बोनेट आणि समोरील केबिन पूर्णपणे दबले गेले आहे. अपघाताबाबत माहिती मिळताच एनआरआय पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

या अपघातात कारमध्ये पुढे बसलेल्या दोघांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल यांनी दिली.



## ऐरोलीत संविधान दिनी प्रा.अविनाश कोल्हे यांचे व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात रविवारी (दि. २६) भारतीय संविधान दिनी संविधान अभ्यासक, साहित्यिक प्रा. अविनाश कोल्हे यांचे 'भारतीय संविधान : इतिहास, वारसा आणि वैशिष्ट्ये' या विषयावर विशेष व्याख्यान सायं. ६.३० वा. आयोजित करण्यात आले आहे.

प्रत्येक भारतीयाला त्याच्या जगण्याचे अधिकार आणि हक्क तसेच कर्तव्ये याचे मार्गदर्शन घटना करते. नागरिकांनी भारतीय संविधानाविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी या व्याख्यानास उपस्थित रहावे, असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नवी मुंबईमध्ये फटाक्यांमुळे लागल्या ५५ ठिकाणी आगी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी नागरिकांनी फटाके फोडताना किरकोळ स्वरूपाच्या आगी लागल्याची नोंद अग्निशमन दलाकडे आहे. या आगीची माहिती मिळताच नवी मुंबई महानगरपालिकेचे अग्निशमन दलाच्या माध्यमातून त्वरित घटनास्थळी धाव घेऊन या आगी विझवण्यात आल्याने कोणत्याही स्वरूपात मोठ्या प्रमाणात हानी झाली नाही, अशी माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली.



दिवाळीमध्ये आनंद व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून फटाके फोडण्यात येतात आणि हेच फटाके कधीकधी दुर्घटनेला निमंत्रण देतात. अशाच प्रकारे फटाक्यांमुळे शहरात ५५ ठिकाणी आगी लागल्याच्या घटना घडल्या आहेत. सुदैवाने या आगी मोठ्या प्रमाणात नसल्याने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. असे असले तरी अनुमाने ४० ते ५० हजार रुपयांची वित्तहानी झाली आहे, तसेच काही आगी झाडांना लागल्यामुळे निसर्गाची ही हानी झाली आहे. यामध्ये नारळाची झाडे काही प्रमाणात जळाली आहेत. काही आगीमध्ये रॉकेट उडून इमारतीच्या गॅलरीमध्ये पडल्याने गॅलरीमधील साहित्य जळून खाक झाल्याचीही घटना घडली आहे.

### फटाक्यांमुळे लागलेल्या आगी

**वाशी -१३**
**सीबीडी-१०**
**नेरुळ -१९**
**कोपरखैरणे -४**
**ऐरोली -९**

## आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**पनवेल** : इ. नववीत शिकणाऱ्या एका मुलीची इंस्टाग्रामवर बदनामी करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांवर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. करंजाडे येथे राहणारी १४ वर्षीय तरुणी कामोठे येथे नववीच्या वर्गात शिक्षण घेते. ऑक्टोबर महिन्यात शाळेतील वर्गात एका विद्यार्थ्याने पाठीला हात लावत असलेला फोटो 'काइन मास्टर'या व्हिडिओ मेकर ॲपवर एक व्हिडीओ एडिट केला होता, तसेच अश्लील शब्द लिहून इन्स्टा आयडीवरून प्रसारित केले. त्यामुळे मुलीची बदनामी करून तिचे मानसिक खच्चीकरण केल्याचे तपासात समोर आले आहे.

## शिवसेना सानपाडा विभाग पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर



**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या शिवसेना राज्य पातळीवर आपली मोट बांधत असतानाच, स्थानिक पातळीवरदेखील संघटना बांधणी करीत आहे. नवी मुंबईतदेखील शिवसेनेने आपली ताकद वाढवण्यासाठी सुरुवात केली आहे. याआधीच नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केलेला असतानाच स्थानिक पातळीवर कार्यकर्ते जोडले जात आहेत.

सानपाडा विभागीय नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नुकतेच शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. त्या वेळी पदाधिकाऱ्यांना शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी शुभेच्छा दिल्या आणि सानपाडा विभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यावर भर द्या, असे आवाहन केले.

कार्यकर्ता प्रवेश आणि नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्राचे वाटपाच्या कार्यक्रमाचे सानपाडा विभाग प्रमुख भावेश पाटील यांनी आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विसाजी लोके यांनी केले. या वेळी विजय नाहटा यांच्या हस्ते शिवसेना शाखा प्रमुख प्रियेश पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

व्यासपीठावर उपजिल्हा प्रमुख रोहिदास पाटील, दिपकसिंग, अजित सावंत, महिला जिल्हा संपर्कप्रमुख दमयंती आचरे, महिला जिल्हा संघटक सरोज पाटील, महिला शहरप्रमुख सुरेखा गव्हाणे, ॲड. शीतल गायकवाड तसेच सानपाडा नेरूळ विभाग महिला संपर्कप्रमुख राजश्री येवले उपस्थित होते. उपशहर प्रमुख आतिष भोईर, उपविभाग प्रमुख देवेंद्र चोरगे आदी उपस्थित होते.

## तळोजा एमआयडीसीत कचऱ्याची समस्या गंभीर

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये साफसफाई व कचरा वाहतुकीसाठी महापालिकेने पुरेशी व्यवस्था केलेली नाही. यामुळे अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसत आहेत. कचरा वाहतुकीसाठी फक्त एकच वाहन असून, मनुष्यबळही अपुरे आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेने पुरेशी तरतूद करावी, अशी मागणी उद्योजक संघटनेने केली आहे.

पनवेल पालिका कार्यक्षेत्रामध्ये ८७६ हेक्टर जमिनीवर तळोजा एमआयडीसी उभारण्यात आली आहे. १,६२२ औद्योगिक भूखंड आहेत. एमआयडीसीमध्ये ४२.१८ किमी लांबीचे रस्ते असून, त्यामध्ये २२.५४ किमी लांबीचे रस्ते काँक्रीटचे आहेत. १९.६४ किमी लांबीचे रस्ते डांबरीकरणाचे आहेत.

साफसफाईसाठी अपुरे मनुष्यबळ व कचरा वाहतुकीसाठी पुरेशी वाहने नसल्यामुळे कचऱ्याची समस्या गंभीर होत चालली आहे. वेळेवर कचरा उचलला जात नाही. येथील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याचीही भीती टीबीआयने व्यक्त केली आहे. या समस्येकडे पालिकेचेही लक्ष वेधले आहे.

एमआयडीसीमधील स्वच्छतेची जबाबदारी महानगरपालिकेची आहे, पण मनपाकडून पुरेशी व्यवस्था केली जात नसल्याचे तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन अर्थात टीबीआयने निदर्शनास आणून दिले आहे. संघटनेचे अध्यक्ष सतीश शेट्टी व इतर सदस्यांनी या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. कचरा उचलण्यासाठी फक्त एक वाहन आहे. याबाबतसुद्धा त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## चिरनेरला कार्तिकी एकादशी सोहळा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील चिरनेर कलानगर येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात प्रबोधिनी कार्तिकी एकादशी उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.



या वेळी कार्तिकी एकादशीच्या मुख्य दिवशी प्रसिद्ध मूर्तिकार नंदकुमार चिरनेरकर आणि त्यांच्या सहचारणी उर्मिला चिरनेरकर यांना विठ्ठल रखुमाईच्या पूजेचा मान देण्यात आला होता. या उभयतांच्या हस्ते सकाळी ७ वाजता विधिवत पूजन करण्यात आले.

मूर्तिकार भाई चौलकर, दीपक गोरे, किरण कुंभार, गजानन चौलकर, दामोदर चौलकर तसेच अन्य कार्यकर्ते व कुंभार समाजबांधव उपस्थित होते. दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील नागरिकांनी विठ्ठल मंदिरात येऊन दर्शन घेतले.

धाकटेभोम येथील विठ्ठल रखुमाई मंदिरातही कार्तिकी एकादशीनिमित्त कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.



**ठाणे : शिवसेना आमदार रवींद्र फाटक यांची भाजपचे पनवेल शहर सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते यांनी सदिच्छा भेट घेतली. या वेळी मंगेश चंदने उपस्थित होते.**

## पैशाने तुटली नाती नाटकाचा मंगळवारी पहिला प्रयोग

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

तालुक्यातील अष्टगंध कला मंचाने निर्मिती केलेली, पैशाने तुटली नाती ही नाट्य कलाकृती महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झाली असून स्पर्धेच्या शुभारंभाचा पहिला प्रयोग सादर करण्याचा कला मंचाला मिळाला आहे. ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात मंगळवारी (दि. २८) सायंकाळी ७ वाजता स्पर्धेतील शुभारंभाचा पहिला प्रयोग सादर होणार आहे.



स्पर्धेत राज्यातील २५ नाट्यसंस्थांनी भाग घेतला आहे. सध्या या नाट्यप्रयोगाच्या सरावाची जोरदार तयारी सुरू झाली असून, या नाट्यसंहितेचे लेखन नाटककार हासुराम पाटील यांनी केले आहे, तर नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. या नाटकाच्या शुभारंभाचा प्रयोग जासई रांजणपाडा येथे सादर करण्यात आला होता. कौटुंबिक जिव्हाळ्याचे परंतु पैशाच्या हव्यासापोटी रक्ताच्या नात्याने बांधलेल्या नात्यांमध्ये कलह निर्माण होतो. अखेर संकटात रक्ताचीच नाती उपयोगी येतात. असे नव्या पिढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे हे सामज प्रबोधन करणारे, दोन अंकी नाटक राज्य नाट्यस्पर्धेत सहभागी झाले आहे.

या नाटकात सुमित कुंभार, वैशाली मोहिते, रुचिता म्हात्रे, परेशा सरोदे, अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, प्रसाद कडू ,रोशन घरत, चेतन पाटील, नवनीत माळी, आदी कलाकार आपल्या अभिनयातून भूमिका बजावणार आहेत. आनंद कुबल यांचे या नाटकाला प्रासंगिक संगीत लाभले आहे.

## भाताण पंचक्रोशीतील वारकऱ्यांची पायी दिंडी धाकटी पंढरीत दाखल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री विठ्ठल पायी कोकण दिंडी भाताण पंचक्रोशी यांच्यावतीने गुरुवारी (दि. २३) कार्तिकी एकादशीनिमित्त भाताण, भाताणपाडा, शिवाजीनगर, कसळखंड, आष्टे, आरिवली व अजिवली यांच्या वतीने सकाळी ८ वाजता भाताण येथून अजिवली येथील संजय चंद्रकांत काठावले यांच्या आवारात येताच दिंडीचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

स्मिता काठावले यांनी दिंडीतील महाराजांचे पाय धुवून औक्षण केले व आशीर्वाद घेतले. या वेळी दिंडीचालकांनी कीर्तन करून फराळाचा आस्वाद घेतला. यानंतर दिंडी अजिवलीमार्गे बारवई मंदिरात आली. या वेळी हभप ज्ञानराज महाराज खारघर यांचे प्रवचन झाले. तेथून सायंकाळी ५ वाजता महड येथे श्री वरदविनायकाचे दर्शन घेऊन दिंडी धाकटी पंढरी साजगाव येथे विठू रखुमाई मंदिरात सायंकाळी ६ ते ७ वाजता हभप योगेश महाराज भगत यांचे कीर्तन




झाले, तर शिवचरित्रकार हभप संतोष महाराज सते व हभप नारायण महाराज मगर यांनी दिंडीतील वारकरी संप्रदायासाठी सहकार्य केले.

या वेळी सरपंच तानाजी पाटील, हभप अनंता महाराज पाटील, संजय काठावले, अनंता काठावले, माजी उपसरपंच निराबाई वसंत काठावले, लक्ष्मीबाई जनार्दन काठावले आदींसह भाताण व आसपासच्या पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना, भाजपकडून पक्षबांधणी

**रोहे : प्रतिनिधी**

जिल्ह्यात झालेली मागील ग्रामपंचायत निवडणूक पाहता या निवडणुकीत ग्रामस्तरावर झालेल्या युती-आघाडी या नव्या राजकीय समीकरणाची नांदी असल्याचे बोलले जात आहे.




> ग्रामपंचायत निवडणुकीत स्थानिक पातळीवर झालेल्या वेगवेगळ्या आघाड्या-युत्या पाहता रोहा तालुक्यातही रंगतदार लढती झाल्या. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व रोहा तालुक्यावर आहे. राज्यात हा पक्ष भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या साथीने राज्यात आहे. त्यामुळे आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत युतीची ताकद वाढणार आहे.

रोहा तालुका हा श्रीवर्धन, अलिबाग मुरूड व पेण विधानसभा मतदारसंघात विभागला गेल्याने या तालुक्याला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटी नंतर पहिल्यांदाच या महिन्यात ग्रामपंचायत निवडणुका झाल्या. या निवडणुकीत ग्रामस्तरावर साऱ्याच राजकीय पक्षांनी आपली ताकद लावून उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न केला. पहिल्यांदाच या ग्रामपंचायतीमध्ये वेगवेगळी समीकरणे ग्रामस्तारावरून युती-आघाडीतून दिसून आली.

रोहा तालुक्यात शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष हे दोन्ही पक्ष आपली संघटना बळकट करण्यासाठी मोर्चेबांधणी करताना दिसत आहेत. मागील ग्रामपंचायत निवडणुकीत शिवसेनेला मिळालेले यश दखल घेण्यायोग्य आहे.

खासदार सुनील तटकरे यांचा रोहा तालुका हा बालेकिल्ला. खासदार तटकरे रायगड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. राष्ट्रवादी फुटीनंतर खासदार तटकरे यांनी हा तालुका आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी पुरेपूर काळजी बाळगली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गट तालुक्यात सक्षम आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नव्या समीकरणात ग्रामस्तरावरचे नेते कोणाकडे आकर्षिले जातात यावर आता कोणतेच भाकित पुढे येऊ शकत नाही, पण ग्रामस्तरावर गेल्या निवडणुकीत रोहा तालुक्यात राष्ट्रवादी पक्ष अजित पवार गटाने वर्चस्व अबाधित ठेवण्यात यश मिळवले आहे, तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटानेही मुसंडी मारली.

रोहा अष्टमी नगर परिषदेवर गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीची सत्ता आली असली तरी अपक्षही त्या वेळेला निवडून आले होते. सध्या तरी राष्ट्रवादी चांगली ताकद रोह्यात राखून आहे.

दुसरीकडे माजी आमदार धैर्यशील पाटील या वेळी पक्षसंघटना बांधत असताना ग्रामस्तरावरील त्यांच्या गाठीभेटी, नागरिकांशी होत असलेला संवाद पाहता भाजप रोहा तालुक्यात ताकदीने उभा राहणार असल्याचे दिसून येत आहे. भाजपकडे कार्यकर्ते येऊ लागल्याचे दिसून येत आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते माजी खासदार अनंत गीते यांनी रायगड लोकसभा निवडणुकीसाठी पुन्हा एकदा दंड थोपटले आहेत. शेतकरी कामगार पक्ष कुणासोबत जातो हे पहावे लागेल, तर भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी अशी युती कायम असल्यास त्यांचा उमेदवार विजयी होईल असे सरळ समीकरण आहे.

# एकदरा खाडी गाळमुक्त करण्याची मच्छीमारांची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडच्या एकदरा खाडीमध्ये फार पूर्वीपासून मच्छीमार होड्या उभ्या केल्या जातात. हे जुने बंदर असून गेल्या कित्येक वर्षे गाळ न काढल्यामुळे होड्या एका ठिकाणी नांगरून ठेवता येत नाहीत. यासाठी स्थानिक मच्छिमारांना खोरा तसेच आगरदांडा किनारा गाठावा लागत आहे.

जागा अपुरी पडत असल्याने मुरूड-एकदरा येथील मच्छीमार बांधवांना समुद्राकिनारी आपल्या बोटी लावताना दमछाक करावी लागते. शहराच्या हाकेच्या अंतरावर एकदरा गाव असून या गावाला व शहराला जोडून एकदरा खाडी आहे. या खाडीजवळ शेकडो कोळी मच्छीमार बांधव आपल्या बोटी किनारी उभ्या करीत असतात. सध्या खाडीत गाळ जास्त साचल्याने बोटी किनाऱ्यावर आणताना बोटीचे आतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे मासेमारी करणारे कोळी बांधवांना आपल्या बोटी किनाऱ्यावर न आणता खोल समुद्राच्या पाण्यात थांबवाव्या लागतात. परिणामी बोटीतून मासळी उतरतेवेळी नुकसान होत आहे. त्याचबरोबर कोळी महिलांना मासळी किनाऱ्यावर आणतेवेळी कसरत करावी लागते.

या खाडीतील गाळ काढून ही खाडी रूंद व खोलगट करावी, जेणेकरून कोळी बांधवांच्या होड्या तिथे राहू शकतील. या ठिकाणी शेकडोंच्या संख्येने होड्या शाकरल्या जाऊ शकतात. त्याबरोबर आधुनिक बंधारा बांधण्यासाठी मत्स्यविभागाने पुढाकार घेऊन त्याची निर्मिती लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणीसुद्धा मच्छिमारांनी केली आहे.



(छाया : संजय करडे)

# बोंडीचामाळ येथील आदिवासी राष्ट्रवादीत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील कोस्ते खुर्द येथील बोंडीचा माळ आदिवासीवाडीतील ग्रामस्थ व महिला मंडळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. निजामपूर येथे राष्ट्रवादी कार्यालयात महाड, पोलादपूर, माणगाव विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश झाला.

या कार्यक्रमास निजामपूर विभागीय अध्यक्ष संदीप जाधव, सचिव किरण पागार आदी उपस्थित होते.

या वेळी कोस्ते खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील बोंडीचा माळ या आदिवासी वाडीतील ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे सोंडेमाळ, बोंडीचा माळ आदिवासी, बौद्धवाडी, जांभूळमाळ मुंबईकर-सुरतकर, ग्रामस्थ आणि महिला मंडळ, राष्ट्रवादीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी स्वागत केले.




# कोस्ते बौद्धवाडीतील ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघातील निजामपूर विभागात असलेल्या कोस्ते बौद्धवाडीतील ग्रामस्थ महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत आमदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली व उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या वेळी आशिष गायकवाड, रूपेश शिर्के, जितेंद्र गायकवाड, संदीप गायकवाड, मिलिंद गायकवाड, प्रशांत गायकवाड, स्वप्नील गायकवाड, गौतम गायकवाड, किशोर गायकवाड, संदीप गायकवाड, सचिन गायकवाड, दीपक गायकवाड, आकाश गायकवाड, चेतन गायकवाड, रत्नाकर गायकवाड, नितीन गायकवाड, अशोक गायकवाड, प्रकाश गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, हिरामण शिर्के, सुमित गायकवाड, सुप्रिया शिर्के, भारतीय शिर्के, अनिल पवार, सोनक गायकवाड, स्नेहल गायकवाड, रुचिता शिर्के, अंकिता शिर्के, नंदिनी गायकवाड, दीक्षा गायकवाड, सुलोचना गायकवाड, अश्विनी गायकवाड, गीता गायकवाड, श्वेता गायकवाड, वनिता गायकवाड, सुजाता गायकवाड, बंटी गायकवाड, सोनी गायकवाड, सुवर्णा गायकवाड, अक्षता गायकवाड, आकाश गायकवाड, नंदा गायकवाड, अनुसया गायकवाड, पार्वती गायकवाड, गणेश चव्हाण, राकेश पार्टी, सुरेश पार्टी, जितेंद्र सुर्वे यांनी आमदार भरत गोगावले यांच्या माध्यमातून होत असलेल्या विकासकामांनी प्रभावित होऊन शिवसेनेत प्रवेश केल्याचे शिवसेना नेते सुधीर पवार यांनी सांगितले.



(छाया : सलीम शेख)

# किल्ला स्पर्धेत साहिल पाटील, तर रांगोळी स्पर्धेत ऐश्वर्या चौधरी प्रथम

**खोपोली : प्रतिनिधी**

देवन्हावे गावातील अभी युवा ग्रुपच्या वतीने कै.रोहित कडव याच्या स्मरणार्थ किल्ला व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत गावातील तरुण-तरुणींनी मोठा सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

किल्ले स्पर्धेत साहिल पाटील, आदित्य पाटील, कुणाल पाटील, संस्कार आंबवणे, सोहम चौधरी यांच्या टीमने प्रथम, स्वयम् नलावडे, स्वरा नलावडे टीमने द्वितीय आणि अविर भुर्केने तृतीय क्रमांक पटकाविला, तर रांगोळी स्पर्धेत ऐश्वर्या चौधरी, आर्या चौधरी टीमने प्रथम, वरद नलावडे, विधी नलावडे टीमने द्वितीय आणि तृतीय क्रमांक वैशाली पाटील हिने प्राप्त केला. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उत्तेजनार्थ राज पाटील, सिद्धी भोपतराव, नियती चौधरी या स्पर्धकांनाही सन्मानित करण्यात आले.



स्पर्धेचे परीक्षण शिवव्याख्याते अविनाश मोरे व अल्पेश यांनी केले. पारितोषिक वितरणास अपघातग्रस्तांच्या मदतीला ग्रुपचे प्रमुख गुरूनाथ साठीलकर, आदित्य वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जावळे, रामकृष्ण पालकर, सुनील पाटील, मधुकर पाटील, मोहन तावडे, गुरूनाथ नलावडे, पुंडलिक बारस्कर, अनिता नलावडे, सीमा चव्हाण, यशवंत पाटील, महेश चव्हाण, गणेश चौधरी, गणेश पालकर, अभि युवा गृपचे सदस्य अतिष पाटील, ओमकार वाणी, ॲड. जयेश तावडे, श्रेयस चौधरी, शिवतेज तावडे, रोहित नलावडे, यश पाटील, अवधूत पालांडे, हर्षल चौधरी, गौरव बारस्कर, सिद्धीक बारस्कर, नयन देशमुख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# कोकण रेल्वेच्या धडकेत आणखी एकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ते गोरेगाव रेल्वेस्थानकांदरम्यान कोकण रेल्वेच्या धडकेने मुगवली येथील एक २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच लगेचच माणगावजवळ इंदापूर ते कोलाडदरम्यान कोकण रेल्वेच्या धडकेत ४८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. २३) रात्री ९.२०च्या सुमारास घडली.

माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, प्रकाश कृष्णा डवले (वय ४८, रा. गंगेवाडी ता. माणगाव) यांना कोकण रेल्वेची धडक लागून त्यामध्ये ते गंभीर जखमी होऊन मृत झाले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे.

# पोलिसांना शिवीगाळ, मारहाण; दोघांवर गुन्हा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कर्तव्यावर असलेल्या पोलिसांना शिवीगाळ, दमदाटी, धक्काबुक्की व मारहाण करून गळ्यास दुखापती केल्याच्या तक्रारीनुसार दोघांवर रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उसर येथे गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजता कंपनी गेटसमोर सोम प्रोजेक्ट कंपनीची वाहने अडवून भांडणे केली जात असल्याचे समजल्याने रेवदंडा पोलीस तेथे पोहचले. या वेळी पोलीस कर्मचारी एम.डी. ठाकूर हे उसर येथील संतोष नरेश पाडेकर यास ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असताना पाडेकर याने पोलीस ठाकूर यांचा गणवेशाचा शर्ट खेचून, बटन तोडून नुकसान केले तसेच पोलिसाचा गळा घसा धरून शिवीगाळ, दमदाटी, मारहाण करून त्यांच्या गळ्यास दुखापती केल्या. त्यानंतर पोलीस एम.डी.ठाकूर व कर्मचारी हे संतोष पाडेकर याला जीपमधून घेऊन रेवदंडा पोलीस ठाण्याकडे जात असताना स्वप्नील संतोष पाडेकर याने चौल चौकी येथे पोलीस जीपला दुचाकी आडवी टाकून एम.डी. ठाकूर व पोलीस स्टाफला शिवीगाळ, दमदाटी, धक्काबुक्की केली तसेच पोलीस व शासकीय कामात अडथळा आणला, अशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

या प्रकरणी संतोष पाडेकर व स्वप्नील पाडेकर यांच्याविरोधात रेवदंडा पोलीस ठाणे येथे भा.दं. वि.कलम ३५३,३३२,३४१,१८९,५०४,३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरिक्षक दीपक म्हशीलकर करीत आहेत.


**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र.** ०२१४१-२२४१३१ | **फॅक्स क्र.** ०२१४१-२२४१३८
ई-मेल :- collector.raigad@maharashtra.gov.in | **ई-मेल** :- dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/ वाहने भाडे तत्त्वावर निविदा/२०२३** | **दि. २३/११/२०२३**

**लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३**
**विविध प्रकारची वाहने पुरवठा करणेबाबत ई निविदा सुचना**

आगामी **लोकसभा/विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **विविध प्रकारची वाहने भाडे तत्त्वावर पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :**- रायगड जिल्ह्यातील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **विविध प्रकारची वाहने भाडे तत्वावर पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ८० लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. १६,०००/- (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. १,६०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. २,४०,०००/- |
| ई- निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. २४/११/२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. २४/११/२०२३ सकाळी १०.०० पासून ते दि. ०९/१२/२०२३ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. २८/११/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. ०९/१२/२०२३ सकाळी सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. १२/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/-**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**


# खारुताईंनी वळवला जंगलाकडे मोर्चा

**माणगाव : प्रतिनिधी**

शांत, भित्री व तुरुतुरु धावणारी खार एकेकाळी गावाची ओळख असायची. घराच्या अंगणात, परसात, आजूबाजूला लहान-मोठ्या झाडांमध्ये हमखास खारुताईची सळसळ ऐकू यायची. गावांमध्ये, छोट्या नगरांमध्ये गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बदल होत गेले. कुडामेडींची, गवत पेंढ्यांची घरे जाऊन सिमेंटची पक्की घरे निर्माण झाली. आजूबाजूला असणारी झाडी कमी झाली. गावाच्या आजूबाजूला असलेली बांबूची बेटेही कमी होत गेली. यामुळे खारीचे अधिवास कमी होत गेले.

खारुताई ही शांत व उंच झाडांच्या शेंड्यांवर घर बांधून राहणारी आहे. अत्यंत भित्रा म्हणून या प्राण्याची सर्वत्र ओळख आहे. महाराष्ट्रात चार प्रकारच्या खारी आढळतात, तर जगभरात एकूण २०० प्रकारच्या खारी आढळून येतात. छोटी, मोठी फळे खाणारी, आपल्या तीक्ष्ण दातांनी फळांचा आस्वाद घेणारी खार समृद्ध अशा प्राणीसंपदेचे, वनसंपदेचे प्रतीक मानले जाते. गावात होणाऱ्या बदलांमुळे गावांमधे खार हा प्राणी दुर्मिळ होऊ लागला आहे, मात्र गावाबाहेरच्या जंगलांमध्ये खार मोठ्या प्रमाणात दिसू लागली असून खार प्राण्यांनी जंगलांना जवळ केल्याचे प्राणीप्रेमी सांगतात.

अनेक गोष्टींमधून, कथांमधून, कवितातून खार हा प्राणी आढळतो. रामायणातही खारूताईचा उल्लेख असून खारीच्या पाठीवर असणाऱ्या वैशिष्टचपूर्ण अशा पट्ट्यामुळे तिच्याविषयीची एक उत्सुकता सर्वसामान्यांमध्ये असते. महाराष्ट्राचा राज्य प्राणी शेकरूशी साधर्म्य साधणारी खार गावांमध्ये दुर्मिळ झाल्याने प्राणीप्रेमींमध्ये नाराजी आहे.

गेल्या काही वर्षांपासून गाव संस्कृतीमध्ये झालेल्या बदलाचा परिणाम खारुताईच्या दैनंदिनीवर पडत असतो. खार बहुतांशी शाकाहारी प्राणी आहे. वड, पिंपळ यांसारख्या मोठ्या झाडांवर बहुतांशी तिचे वास्तव्य असते. या झाडांची फळे या प्राण्याला आवडतात.



> **गेल्या काही वर्षांपासून गावात खार प्राणी कमी दिसत आहे. गावांमध्ये घरांच्या आजूबाजूला असणारी झाडे, इतर वनस्पती कमी झाल्या आहेत. त्यामुळे अधिवास कमी झाल्याने हा प्राणी जंगलातून दिसत आहे.**
> **-श्वेता मोंडे, प्राणीप्रेमी**

> **गावातील घरांच्या अंगणात, कुंपणावर, झाडांवर खार हा प्राणी हमखास नजरेस पडायचा. अलीकडे गावातील झाडे, कुंपण कमी झाल्याने खार हा प्राणी दुर्मिळ होऊ लागला आहे. त्यामुळे लहान मुलांचे मनोरंजन व ओळखही होत नाही.**
> **-गणपत कालप,**
> **ज्येष्ठ नागरिक**

# भारताचा ऑस्ट्रेलियावर रोमहर्षक विजय

## टी-२० मालिकेत विजयी सलामी

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा दोन गडी राखून पराभव केला आहे. या सामन्यात जोश इंग्लिसच्या झंझावाती शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने २० षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात २०८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने सूर्यकुमार यादवच्या ८० आणि इशान किशन ५८ धावांच्या झंझावाती खेळीमुळे शेवटच्या षटकात लक्ष्याचा पाठलाग केला. एक चेंडू शिल्लक असताना रिंकू सिंगने भारताला विजय मिळवून दिला.

भारताने १९ षटकांत पाच विकेट गमावत २०२ धावा केल्या होत्या. भारताला विजयासाठी सहा चेंडूत सात धावा करायच्या होत्या. रिंकू सिंग आणि अक्षर पटेल क्रीजवर होते. सीन अ‍ॅबॉटच्या पहिल्याच चेंडूवर रिंकूने चौकार ठोकला. यानंतर पाच चेंडूत तीन धावा हव्या होत्या. पुढच्याच चेंडूवर रिंकूने एक धाव घेतली. यानंतर अक्षर पटेल तिसऱ्या चेंडूवर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ फलंदाजीला आलेला रवी बिश्नोई चौथ्या चेंडूवर धाव घेण्याच्या प्रयत्नात धावबाद झाला. भारताला दोन चेंडूंवर दोन धावा करायच्या होत्या. पाचव्या चेंडूवर रिंकू सिंगने लेग साईडवर शॉट खेळून धाव घेतली. एक धाव पूर्ण झाली आणि दुसऱ्या धावण्याच्या प्रयत्नात अर्शदीप सिंग धावबाद झाला.



शेवटच्या चेंडूवर एक धाव आवश्यक होती. रिंकू स्ट्राइकवर होता. तो बाद झाला असता किंवा धावा करू शकला नसता, तर सामना सुपर ओव्हरमध्ये गेला असता, पण तसे झाले नाही. सीन अ‍ॅबॉटच्या चेंडूवर रिंकूने षटकार ठोकला. दुर्दैवाने त्या सहा धावा रिंकूच्या खात्यात जमा झाले नाहीत. कारण अ‍ॅबॉटचा पाय रेषेच्या बाहेर गेला होता आणि पंचांनी तो नो-बॉल घोषित केला. अशा परिस्थितीत भारताच्या खात्यात षटकारऐवजी एक धाव जमा झाली आणि टीम इंडियाने एक चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. रिंकू सिंगने १४ चेंडूत २२ धावा करून नाबाद परतला.

२०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाचे दोन्ही सलामीवीर १५ चेंडूंतच पॅव्हेलियनमध्ये परतले. ऋतुराज गायकवाड पहिल्याच षटकात खाते न उघडता धावबाद झाला. त्याला एका चेंडूचाही सामना करता आला नाही. तिसऱ्याच षटकात यशस्वी जैस्वाल पॅव्हेलियनमध्ये परतला. यशस्वीने आठ चेंडूंत २१ धावा केल्या. दोन गडी बाद झाल्यानंतर इशान किशन आणि सूर्यकुमार यांनी डावाची धुरा सांभाळली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ११२ धावांची भागीदारी केली.

सूर्यकुमारने ४२ चेंडूंत ८० धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत नऊ चौकार आणि चार षटकार मारले, तर इशान किशनने ३९ चेंडूत ५८ धावा केल्या. त्याने दोन चौकार आणि पाच षटकार मारले. तिलक वर्माने १२ आणि अक्षर पटेलने २ धावा केल्या. रवी बिश्नोई आणि अर्शदीप सिंग यांना खातेही उघडता आले नाही. मुकेश कुमार शून्यावर नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून तन्वीर संघाने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या.

# विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेत मुंबईची विजयी सुरुवात



**अलूर : वृत्तसंस्था**

तुषार देशपांडे (१९ धावांत तीन बळी), अथर्व अंकोलेकर (१३ धावांत दोन बळी) आणि मोहित अवस्थी (नऊ धावांत दोन बळी) यांच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर मुंबईने गुरुवारी विजय हजारे चषक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेतील आपल्या सलामीच्या लढतीत सिक्कीमवर सात गडी राखून मात केली.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या सिक्कीम संघाच्या फलंदाजांचा मुंबईच्या गोलंदाजांसमोर निभाव लागला नाही. सिक्कीमचा डाव ३८.१ षटकांत ८९ धावांवर संपुष्टात आला. कर्णधार नीलेश लामिचाने (२९) व सलामीवीर पंकज रावत (१४) वगळता कोणालाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. मुंबई संघाने हे माफक आव्हान १२ षटकांत ३ बाद ९० धावा करीत पूर्ण केले.

मुंबईकडून सलामीवीर अंगक्रिश रघुवंशी (३०), जय बिस्ता (२८) आणि प्रसाद पवार (१४) हे चांगल्या सुरुवातीनंतर बाद झाले. कर्णधार अजिंक्य रहाणे (नाबाद १५) व सर्फराज खान (नाबाद २) यांनी मुंबईचा विजय सुनिश्चित केला. सिक्कीमकडून सुमित सिंहने (२/२७) चांगली गोलंदाजी केली.

दुसरीकडे गेल्या काही काळापासून भारतीय संघातून बाहेर असलेला अनुभवी लेग-स्पिनर यजुवेंद्र चहलच्या (२६ धावांत सहा बळी) प्रभावी माऱ्यानंतर युवराज सिंगने (६८) झळकावलेल्या अर्धशतकाच्या बळावर हरियाणाने उत्तराखंडवर सहा गडी राखून विजय मिळवला. उत्तराखंडने आदित्य तरेच्या (६५) खेळीमुळे २०७ धावांपर्यंत मजल मारली. हरियाणाने ४५ षटकांत ४ बाद २०८ धावा करीत हे आव्हान पूर्ण केले.

विराट सिंगच्या (१४३) आक्रमक शतकाच्या जोरावर झारखंडने महाराष्ट्र संघावर सहा गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना महाराष्ट्राने अंकित बावणेच्या (नाबाद १०७) शतकाच्या बळावर ४ बाद ३५५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात विराटला सौरभ तिवारी (नाबाद ७०), कुमार कुशाग्र (नाबाद ६७) व विनायक विक्रम (५३) यांनी दिलेल्या साथीमुळे झारखंडने ४८ षटकांत ४ बाद ३५९ धावा करीत विजय साकारला.



# प्रकाशिका नाईकला भाजपकडून शुभेच्छा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील वाशी येथे वास्तव्य करणाऱ्या प्रकाशिका प्रकाश नाईक हिची भारतीय महिला क्रिकेट संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड झाली आहे. याबद्दल भाजप नवी मुंबई महिला मोर्चाच्या शिष्टमंडळाने तिची निवासस्थानी भेटून शुभेच्छा देत प्रोत्साहित केले.

या वेळी भाजप महिला मोर्चाच्या नवी मुंबई जिल्हाध्यक्ष माधुरी जयेंद्र सुतार यांनी स्थानिक माजी नगरसेविका अंजली वाळुंज, शरयू पड्याल, उन्डेताई, उज्वला सुतार, स्मिता यांच्यासमवेत प्रकाशिकाची भेट घेतली तसेच तिची निवड म्हणजे नवी मुंबईची शान आणि महाराष्ट्राचा गौरव आहे, असे मत व्यक्त करून तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# व्हीव्हीएस लक्ष्मण भारताचा नवा प्रशिक्षक होण्याचे संकेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाला दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर नवा प्रशिक्षक मिळणार आहे. राहुल द्रविडच्या जागी त्याचा सहकारी खेळाडू आणि राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचा (एनसीए) अध्यक्ष व्हीव्हीएस लक्ष्मण याला स्थान दिले जाईल. वृत्तानुसार लक्ष्मणनेभारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) अधिकाऱ्यांचीही भेट घेतली आहे.

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना १९ नोव्हेंबर रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळला गेला. भारताचा प्रशिक्षक म्हणून राहुल द्रविडचा हा शेवटचा सामना होता. नोव्हेंबर २०२१मध्ये तो दोन वर्षांच्या करारावर संघात दाखल झाला होता. रिपोर्ट्सनुसार, आता त्याला कोचिंग कॉन्ट्रॅक्ट वाढवायचा नाही.

सध्या लक्ष्मण भारतीय संघासोबत ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळत आहे. राहुल द्रविडचा प्रशिक्षक असतानाही त्याने अनेकदा ही भूमिका साकारली आहे. नुकताच तो संघासोबत आयर्लंड दौऱ्यावर गेला होता. गेल्या वर्षी टी-२० विश्वचषकानंतर न्यूझीलंड दौऱ्यावर मर्यादित षटकांच्या मालिकेतही तो प्रशिक्षक होता.



बीसीसीआयच्या सूत्राचा हवाला देत एका वृत्तसमुहाने म्हटले आहे की, लक्ष्मणने या कामात रस दाखवला आहे. विश्वचषकादरम्यान लक्ष्मण या संदर्भात बीसीसीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी अहमदाबादला गेला होता. तो दीर्घकाळ टीम इंडियाचा प्रशिक्षक म्हणून करार करू शकतो. प्रशिक्षक म्हणून तो दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर जाणार आहे. पूर्णवेळ प्रशिक्षक म्हणून हा त्याचा पहिलाच दौरा असेल.

### सहाय्यक प्रशिक्षकांची भूमिका गुलदस्त्यात

द्रविडसह त्याच्या सहाय्यक प्रशिक्षकाची भूमिका निभावणारे इतर प्रशिक्षक काय निर्णय घेतात हे पाहायचे आहे. फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड, गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांबरे आणि क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी दिलीप यांच्याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा भारताच पहिला टी-२० सामना १० डिसेंबरला होणार असून ४ ते ५ डिसेंबरपर्यंत संघ दौऱ्यावर रवाना होण्याची शक्यता आहे.


द्रविडने बीसीसीआयला कळवले आहे की, त्याला प्रशिक्षकपदी राहण्यात रस नाही. जवळपास २० वर्षे त्यांनी भारतीय संघासोबत एक खेळाडू म्हणून दौरा केला आहे. गेल्या काही वर्षांत प्रशिक्षक म्हणून त्यांनी हे काम केले. आता त्याला हे करायचे नाही. एनसीए प्रमुखाची भूमिका घेण्यास त्याला कोणतीही अडचण नाही, ज्यामुळे त्याला त्याच्या मूळ गावी बंगळुरूमध्ये राहण्याची परवानगी मिळते. तो यापूर्वी एनसीएचा प्रमुख होता.

# फायनलमधील पराभव पचवणे अवघड, पण भविष्याचा विचार गरजेचा -कुलदीप यादव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून झालेला पराभव पचवणे अवघड असले, तरी आता आम्ही भविष्याचा विचार करणे गरजेचे असल्याचे भारताचा चायनामन फिरकीपटू कुलदीप यादव म्हणाला. तो आपल्या 'एक्स'वरील पोस्टमध्ये व्यक्त झाला आहे.

चेन्नईपासून सुरू झालेला आमचा विश्वचषकाचा प्रवास अहमदाबाद येथे निराशाजनक निकालासह संपला, मात्र सहा आठवड्यांच्या कालावधीत केलेल्या कामगिरीबाबत आम्ही समाधानी आहोत. विश्वचषक जिंकता न आल्याचे दुःख निश्चित आहे, परंतु पुढील संधीसाठी आम्ही अधिक मेहनत घेऊ. अंतिम सामन्यातील पराभव पचवणे अवघड असले, तरी आता आम्ही



भविष्याचा विचार करणे गरजेचे आहे. आयुष्य सुरू राहणार आहे. वेदना विसण्यासाठी वेळ जावा लागेल, असे कुलदीपने नमूद केले आहे.

'आमच्या प्रशिक्षक आणि साहाय्यक प्रशिक्षकांचे खूप आभार. त्यांनी प्रत्येक प्रतिस्पर्ध्याचा पूर्ण अभ्यास करून आमच्याकडून तयारी करवून घेतली. त्यांचे मार्गदर्शन आमच्यासाठी खूप महत्त्वाचे ठरले तसेच नऊ स्टेडियमवर चाहत्यांकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे आम्हाला सर्वोत्तम कामगिरी करण्याची प्रेरणा मिळाली. जगभरातील भारतीय चाहत्यांकडून मिळणाऱ्या पाठिंब्यासाठी आम्ही स्वत:ला भाग्यवान मानतो,' असेही कुलदीपने म्हटलेय.

कुलदीपने विश्वचषकाच्या ११ सामन्यांत १५ गडी बाद केले.

### यशासाठी कायम प्रयत्न करणार -सिराज



विश्वचषक जिंकण्यात आलेल्या अपयशाबद्दल वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजनेही आपल्या भावना व्यक्त केल्या. 'आम्हाला विश्वचषकाचा अपेक्षित शेवट करता आला नाही, पण भारताचे प्रतिनिधित्व करणे ही माझ्यासाठी सर्वात अभिमानाची गोष्ट आहे. देशाकडून खेळणे हे माझे स्वप्न होते आणि ते मी जगत आहे. विश्वचषक न जिंकता आल्याची निराशा शब्दांत मांडणे अवघड आहे. हा पराभव पचवणे खूप अवघड जात आहे. परंतु देशाला यश मिळवून देण्यासाठी आम्ही कायम प्रयत्न करीत राहणार,' असे सिराजने 'एक्स'वर लिहिले.

### चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा

# सात्त्विक-चिराग जोडी, प्रणॉय उपांत्यपूर्व फेरीत



**शेन्झेन : वृत्तसंस्था**

भारताचा अनुभवी बॅडमिंटनपटू एचएस प्रणॉय तसेच सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी या आघाडीच्या जोडीने गुरुवारी चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या प्रणॉयने डेन्मार्कच्या मॅग्नस योहानसेनला २१-१२, २१-१८ असे पराभूत केले. पुरुष एकेरीत प्रणॉय हा एकमेव भारतीय खेळाडू आव्हान टिकवून आहे.

योहानसेनविरुद्ध सामन्यात प्रणॉयने चांगली सुरुवात करताना पहिला गेममध्ये ६-१ अशी आघाडी घेतली, परंतु योहानसेनने जोरदार पुनरागमन करताना १४-११ अशी आघाडी घेतली. यानंतर प्रणॉयने खेळ उंचावत सलग गुण मिळवले आणि पहिला गेम २१-१२ अशा फरकाने जिंकला. दुसऱ्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंनी उत्तम खेळ केला. एक वेळ गेम १८-१८ असा बरोबरीत होता, मात्र प्रणॉयने काही चांगले फटके मारत सलग तीन गुणांची कमाई केली आणि गेमसह सामना जिंकला.

अग्रमानांकित आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या सात्त्विक-चिराग जोडीने जपानच्या अकिरा कोगा व ताइची सेइतो जोडीला २१-१५, २१-१६ असे नमवले. सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करणाऱ्या भारतीय जोडीने प्रतिस्पर्धी जोडीला पुनरागमनाची फारशी संधी दिली नाही.



# अलिबाग संघ ठरला आरपीएलचा मानकरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड प्रीमियर लीगच्या चौथ्या पर्वात अलिबाग येथील एम. डी. वॉरियर्स संघाने विजेतेपद पटकाविले. आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

आरपीएलचे आयोजन मंगेश वाकडीकर व सहकाऱ्यांनी शिरढोण येथे केले होते. या स्पर्धेत ३२ संघांनी सहभाग घेतला. अलिबाग संघाने बाहुबली संघाचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला होता, तर एस. बी. स्पोर्ट्स सुधागड संघाने वीर मराठा जोहे-पेण संघाला मात देत अंतिम फेरी गाठली होती. अंतिम सामन्यात अलिबाग संघाने बाजी मारली.

# क्रिकेटपटू नवदीप सैनी विवाहबद्ध

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेचा थरार रंगला आहे. मालिकेतील पहिला सामना विशाखापट्टणम येथे खेळला गेला, ज्यामध्ये विजय मिळवून भारताने विजयी सलामी दिली.



दुसरीकडे भारताचा वेगवान गोलंदाज नवदीप सैनीने लग्न केले असून त्याची झलक सोशल मीडियाच्या माध्यमातून त्याने शेअर केली आहे.

नवदीप सैनीने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून लग्नाचे फोटो शेअर केले आहेत. यासोबतच खास कॅप्शनही लिहिले आहे. 'अस्थाना, तुझ्यासोबतचा प्रत्येक दिवस हा प्रेमाने भरलेला दिवस आहे. आज आम्ही कायमचे एकमेकांचे झालो आहोत. आम्ही आमच्या आयुष्याचा एक नवीन अध्याय सुरू करीत आहोत', असे सैनीने लिहिले.

नवदीपने स्वाती अस्थानासोबत सातफेरे घेतले. स्वातीबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही, पण रिपोर्ट्सनुसार स्वाती एक फॅशन, ट्रॅव्हलर आणि लाइफस्टाइल ब्लॉगर आहे. तिचे यूट्यूब चॅनेलदेखील आहे. स्वातीने सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली. तिचे इन्स्टाग्रामवर जवळपास ८० हजार फॉलोअर्स आहेत.

नवदीप सैनी मागील बऱ्याच दिवसांपासून भारतीय संघाबाहेर आहे. सैनीने भारतासाठी दोन कसोटी, आठ वनडे आणि ११ ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com